RNI No.: MAHBIL/2016/68485
www.acrossstates.com
पोस्टाचा परवाना क्र. MNW/335/2018-20

# मराठी अक्रॉस मुंबई

संपादक - संजय मंगेश भैरे
वर्ष: १० अंक : ९ ■ मुंबई, मंगळवार २८जानेवारी ते ३ फेब्रुवारी २०२५ मूल्य - ५.०० रुपये ■ पाने - ८

**'छावा'तील आक्षेपार्ह नृत्य हटवणार दिग्दर्शक उतेकर यांची घोषणा**
पान २ वर

**आघाडीचे 100 पराभूत उमेदवार न्यायालयात**
पान ३ वर

## वक्फ बोर्ड दुरुस्ती विधेयक सत्ताधाऱ्यांच्या 12 सुधारणा मंजूर



**नवी दिल्ली**
वक्फ दुरुस्ती विधेयकाला संयुक्त संसदीय समितीने (जेपीसी) मंजुरी दिली आहे. यात एकूण १४ बदल करण्यात आले आहेत. आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात हा अहवाल सभागृहात सादर केला जाईल. सत्ताधारी भाजपचे जगदंबिका पाल यांच्या अध्यक्षतेखालील समितीसमोर एकूण ४४ बदल प्रस्तावित करण्यात आले होते. यांतील बरेच बदल विरोधी पक्षांच्या खासदारांनीही सुचवले होते. मात्र, विरोधकांनी सुचवलेले बदल मतदानाद्वारे फेटाळण्यात आले आहेत.

वक्फ दुरुस्ती विधेयकाची तपासणी करत असलेल्या संयुक्त संसदीय समितीने सोमवारी भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए सदस्यांनी प्रस्तावित केलेल्या सर्व दुरुस्त्या स्वीकारल्या आहेत. तर, विरोधी सदस्यांनी मांडलेल्या सर्व दुरुस्त्या फेटाळून लावल्या आहेत. बैठकीनंतर समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी पत्रकारांशी संवाद साधला. समितीने स्वीकारलेल्या सुधारणांमुळे कायदा अधिक चांगला आणि प्रभावी होईल, असे जगदंबिका पाल यांनी म्हटले आहे.

**विरोधकांचे आरोप**

विरोधी पक्षाच्या खासदारांनी बैठकीच्या कामकाजावर टीका करत, पाल यांच्यावर "लोकशाही प्रक्रिया कमकुवत केल्याचा" आरोप केला आहे. पत्रकारांसोबत बोलतान टीएमसी खासदार कल्याण बनर्जी म्हणाले, "ही बैठक म्हणजे केवळ दिखावा होता. आमचे काहीही एकले गेले नाही. पाल यांनी हुकूमशाही पद्धतीने काम केले." दरम्यान, पाल यांनी हे आरोप फेटाळून लावत संपूर्ण प्रक्रिया लोकशाही पद्धतीनेच पार पडली आणि बहुमताने निर्णय घेण्यात आला, असे म्हटले आहे.

**44 प्रस्तावांपैकी केवळ 14 बदल मंजूर**

समितीसमोर बदलांसाठी एकूण ४४ प्रस्ताव सादर करण्यात आले होते, परंतु केवळ १४ प्रस्तावांनाच मंजुरी देण्यात आली. पाल म्हणाले, विरोधी सदस्यांनी विधेयकाच्या सर्व ४४ कलमांमध्ये शेकडो सुधारणा प्रस्तावित केल्या होत्या, परंतु त्या मतदानाद्वारे फेटाळण्यात आल्या.

**भाजपच्या सर्व 10 प्रस्तावांना मंजूरी**

बैठकीत भाजप खासदारांनी १० दुरुस्त्या सुचवल्या होत्या आणि सर्व दुरुस्त्या मंजूर करण्यात आल्या. याच वेळी, विरोधकांकडून अनेक दुरुस्त्यादेखील मांडण्यात आल्या, परंतु मतदानानंतर त्या सर्व फेटाळण्यात आल्या. विरोधकांनी मांडलेल्या सर्व दुरुस्त्या १०-१६ मतांनी फेटाळण्यात आल्या. तर, भाजपच्या सर्व दुरुस्त्या १६-१० मतांनी स्वीकारण्यात आल्या आहेत.

## डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना सावंतवाडी महाअधिवेश

### नितेश राणे यांनी स्वागताध्यक्ष तर डॉ. अच्युत भोसले यांनी सह स्वागत अध्यक्ष पद स्वीकारले

### सावंतवाडी येथे 6 एप्रिल रोजी होणार महाअधिवेशन

### अध्यक्ष राजा माने यांची घोषणा




**सावंतवाडी**
देशातील पहिल्या डिजिटल मीडिया संपादक पत्रकारांची संघटना असलेल्या डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेचे तिसरे महा अधिवेशन सावंतवाडी (सिंधुदुर्ग) येथे भोसले नॉलेज सिटी च्या प्रांगणात ६ एप्रिल रोजी होणार असून राज्यातील विविध मान्यवरांच्या हस्ते या अधिवेशनाचे उद्घाटन होणार असून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना या अधिवेशनासाठी निमंत्रित केले आहे. या अधिवेशनासाठी महाराष्ट्रातून ३ हजार हून अधिक संपादक पत्रकार उपस्थित राहणार असून या महा अधिवेशनाच्या स्वागताध्यक्षपदी सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे तर सहस्वागत अध्यक्षपदी डॉ. अच्युत भोसले हे राहणार आहेत, या एतिहासिक तिसऱ्या महा अधिवेशनाच्या संयोजक पदाची जबाबदारी संघटनेचे कोकण विभाग अध्यक्ष सागर चव्हाण व सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्ष भरत केसरकर यांच्यावर सोपवली असल्याची माहिती राजा माने यांनी सावंतवाडी येथे पत्रकार परिषदेत दिली.

या महाअधिवेशनासाठी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, उद्योग भरत मंत्री उदय सामंत, रोजगार हमी योजना मंत्री भरतशेठ गोगावले ,आरोग्य मंत्री प्रकाश आबीटकर महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री खासदार नारायण राणे,माजी मंत्री व सिंधुदुर्ग चे आमदार दीपक केसरकर यांना विशेष निमंत्रित करण्यात आले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष राजा. माने साहेब, राज्य उपाध्यक्ष सतीश सावंत ,कोकण विभाग अध्यक्ष सागर चव्हाण , पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष विकास भोसले, राज्य कार्यकारणी सदस्य कुंदन हुलावळे, सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्ष भरत केसरकर यांची उपस्थिती होती. संघटनेचे यापूर्वी भिलार महाबळेश्वर व कनेरी मठ कोल्हापूर येथे महाअधिवेशन झाले होते सावंतवाडी येथे होणाऱ्या तिसऱ्या महाअधिवेशनाच्या निमित्ताने राज्यभरातील आठ विभागातील ज्येष्ठ पत्रकार संपादकांना जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले जाणार आहे. यासह मान्यवर व्यक्तींची प्रकट मुलाखत, डिजिटल मीडिया मधील मान्यवर व अनुभवी व्यक्तींचे मार्गदर्शन, परिसंवाद असे विविध कार्यक्रम होणार आहेत. राज्यभरातील डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेच्या सभासदांनी या अधिवेशनासाठी ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करावी असे आवाहन यावेळी अध्यक्ष राजा माने यांनी केले आहे.

## उत्तराखंडमध्ये समान नागरी कायदा लागू



**देहरादून**
उत्तराखंड राज्यात आजपासून समान नागरी कायदा लागू करण्यात आला आहे. असा कायदा लागू करणारे उत्तराखंड हे देशातील पहिले राज्य बनले आहे. गेल्या वर्षी ७ फेब्रुवारी रोजी उत्तराखंड विधानसभेने समान नागरी कायदा मंजूर केला होता. त्याची अंमलबजावणी आणि नियम तयार करण्यासाठी स्थापन केलेल्या गठित समितीने १८ ऑक्टोबर रोजी आपला अहवाल सादर केला होता. दरम्यान देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी काही दिवसात उत्तराखंडला भेट देणार आहेत याआधी राज्यात समान नागरी कायदा लागू करण्यात आला आहे. हा कायदा लागू झाल्यानंतर आता राज्यात विवाह, लिव्ह-इन रिलेशनशिप आणि वारसा हक्का संबंधी काही नियम बदलले आहेत.

या कायद्यानुसार, विवाहित दाम्पत्याला सहा महिन्यांच्या आत त्यांच्या विवाहाची नोंदणी करणं बंधनकारक असणार आहे. इतकेच नाही तर लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये असलेल्या जोडप्यांना कायदा लागू झाल्यानंतर नोंदणी करण्यासाठी एक महिन्याचा कालावधी दिला जाणार आहे. राज्याच्या मुख्यमंत्र्यांचे सचिव शैलेश बगोली यांनी राज्यात यूसीसी लागू करण्यासंबंधीची घोषणा केली होती. तसेच त्यांनी हेही स्पष्ट केले होते की उत्तराखंडच्या बाहेर राहत असलेल्या राज्यातील नागरिकांना देखील हा कायदा लागू होणार आहे.

अनेक राजकीय पक्षांनी तसेच धार्मिक गटांनी याला विरोध केला होता. तरही राज्य सरकारने समान नागरी कायदा लागू करण्यासंबंधी सर्व प्रक्रिया पूर्ण गेल्या होत्या ज्यामध्ये मंजूरी आणि अधिकृत ट्रेनिंगचा देखील समावेश होता. पुष्कर सिंह धामी यांनी आज यूसीसी पोर्टलचे उद्घाटन करत राज्यात समान नागरी कायदा लागू केला आहे.

यूसीसी हे एक प्रकारे लग्न, घटस्फोट, वारसा हक्क आणि उत्तराधिकारी निवड यासंबंधीच्या पर्सन लॉ एकच करण्याच्या दृष्टीने टाकलेले महत्वाचे पाऊल मानले जात आहे. टाइम्स ऑफ इंडियाच्या रिपोर्टनुसार अनुसूचित जमाती आणि काही संरक्षिच समुदायांना सूट देऊन यूसीसी संपूर्ण उत्तराखंडमध्ये लागू झाला आहे. यूसीसीचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे कायदा लागू झाल्यापासून ६० दिवसांच्या आत सर्व विवाहांची नोंदणी करणे अनिवार्य आहे. २६ मार्च २०१० रोजी किंवा त्यानंतर झालेल्या विवाहांची नोंदणी देखील सहा महिन्यांच्या आत करणे आवश्यक आहे.

## गंगेत डुबकी मारल्याने गरिबी दूर होणार का?

### खर्गेंनी उडविली भाजप नेत्यांच्या कुंभस्नानाची खिल्ली



**महू, दि. २७ वृत्तसंस्था**
भाजप नेत्यांमध्ये गंगेत डुबकी मारण्याची स्पर्धा सुरू आहे. पण गंगेत डुबकी मारून गरिबी दूर होणार नाही. मला कोणाची भावना दुखावायची नाही, असे म्हणत काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी भाजप नेत्यांच्या महाकुंभ मेळ्यातील स्नानावरून भाष्य केले आहे. एवढेच नाही तर, "आरएसएस आणि भाजप देशद्रोही आहेत. जर गरिबी आणि बेरोजगारीपासून मुक्ती हवी असेल, तर संविधानाचे रक्षण करा," असेही खर्गे यांनी म्हटले आहे. ते महू येथे बोलत होते.

खर्गे पुढे म्हणाले, 'मोदी आणि शहा यांनी मिळून एवढे पाप केले आहे की, ते सात जन्मही स्वर्गात जाणार नाहीत. भाजपचे लोक मशिदीखाली मंदिर शोधत आहेत, शिवलिंग शोधत आहेत. एकीकडे भागवत म्हणत आहेत की, असे करू नका आणि दुसरीकडे ते असेच करत आहेत. आज भाजप-आरएसएसचे लोक काँग्रेसबद्दल वाईट बोलत आहेत. पण त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी काहीही केले नाही. हे लोक स्वातंत्र्यलढ्यात इंग्रजांसोबत होते. ते ब्रिटिशांची नोकरी करत होते. स्वातंत्र्यलढ्यात त्यांचे काहीही योगदान नाही. यामुळे, तुम्हाला एकत्र येऊन या लोकांना धडा शिकवावा लागेल आणि तुमच्या हक्कांचे रक्षण करावे लागेल."

गंगा स्नानासंदर्भात बोलताना खर्गे म्हणाले, "अरे भाऊ, गंगेत डुबकी मारल्याने गरिबी दूर होते का?' तुम्हाला जेवण मिळते का? मला कुणाचीही भावना दुखवायची नाही. जर कुणी दुखावले गेले असेल तर मी माफी मागतो. पण तुम्ही मला सांगा, जेव्हा मूल उपासमारीने मरत आहे, मूल शाळेत जात नाही, मजुराला मजुरी मिळत नाही, असे असताना, या लोकांची हजारो रुपये खर्च करून डुबकी मारायची स्पर्धा सुरू झाली आहे. टीव्हीवर काहीतरी चांगले येईपर्यंत डुबकी मारत राहतात. अशा लोकांपासून देशाला काहीही फायदा होऊ शकत नाही."

## मुंबई वगळता अन्य ठिकाणी मविआसोबत लढणार? - संजय राऊत

**मुंबई, दि. २७ प्रतिनिधी**
आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच होऊ शकतात, असा कयास आहे. यासाठी सर्वच पक्षांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. मुंबई महानगरपालिका निवडणूक शिवसेना ठाकरे गट स्वबळावर लढणार असल्याचे सांगितले जात आहे. ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी तसे सूतोवाच केले आहे. स्वबळाचा नारा दिला आहे. परंतु, राज्यातील अन्य निवडणुका महाविकास आघाडीसोबत लढण्याचा विचार ठाकरे गटाचा असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. ठाकरे गट कोणत्या ठिकाणी स्वबळावर निवडणुका लढणार, याबाबत खासदार संजय राऊत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, स्वबळाचा नारा दिला, याचा अर्थ महाविकास आघाडी संपली किंवा तुटली, असा काढता येणार नाही. हा विषय मुंबईपुरता आहे. शिवसेनेने इथे सातत्याने आपली पकड मजबूत ठेवली आहे. ती तशीच ठेवायची असेल तर स्वबळावर लढले पाहिजे, असे मत कार्यकर्त्यांचे आहे. कार्यकर्त्यांच्या भावना शिवसेना पक्ष प्रमुखांनी व्यक्त केल्या आहेत. ही परिस्थिती इतर शहरात किंवा जिल्ह्यात असेल का, याबद्दल साशंकता आहे. त्यामुळे तिथे महाविकास आघाडीतील तीनही पक्षांच्या नेत्यांचे म्हणणे आहे की, एकत्र लढणे गरजेचे आहे, त्या-त्या ठिकाणच्या कार्यकर्त्यांच्या भूमिका लक्षात घेऊन आम्ही निर्णय घेऊ, असे संजय राऊत यांनी स्पष्ट केले.

## पोलिसाचे रेकॉर्डींग व्हायरल करणाऱ्या आठवले गँगवरही मकोका



**बीड**
मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणावरुन सध्या बीड जिल्हा राज्यात चर्चेत असून देशमुख कुटुंबीयांच्या न्यायासाठी अनेक जिल्ह्यात मोर्चेदेखील काढण्यात आले. या प्रकरणामुळे मंत्री धनंजय मुंडेंचे निकवर्तीय असलेल्या वाल्मिक कराडचेही नाव राज्यभरात चर्चेत आले असून खंडणी व खून प्रकरणात त्यांच्यावर आरोप होत आहेत. वाल्मिक कराडचे पोलिसांशी हितसंबंध असून पोलिसांकडूनच त्याला बळ देण्यात येत असल्याचेही आरोप जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी केले आहेत. दरम्यान, खंडणी प्रकरणात वाल्मिक कराडला अटक केल्यानंतर त्याच्यावर मकोका अंतर्गतही कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे, जिल्ह्यातील पोलीस यंत्रणा अलर्ट झाली असून बीडमधील आणखी एका गँगकवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आलीय. डिसेंबर महिन्यात गोळीबार करणाऱ्या आठवले गँगवर देखील पोलिसांनी आता मकोका अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. काही दिवसांपूर्वी पोलीस अधिकारी शितल बल्लाळ यांच्यावर आरोप करत ऑडिओ क्लीप व्हायरल करणाऱ्य सनी आठवलेची ही आठवले गँग आहे.

बीड पोलिसांनी मागील महिनाभरात जिल्हाभरात दहशत माजविणाऱ्या दोन गँगवर मकोका अंतर्गत कारवाई केली आहे. वाल्मिक कराडशी जवळीस असलेल्या सुदर्शन घुले याच्या गँगवर मकोका लावल्यानंतर आज बीड पोलिसांनी आठवले गँगवर देखील मकोकाची कारवाई केलीय. १३ डिसेंबहर २०२४ मध्ये पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीत गोळीबारची घटना घडली होती. त्यातील सहा आरोपींवरही मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. त्यात प्रामुख्याने अक्षय आठवले, सनी आठवले, आशिष आठवले, मनीष क्षीरसागर आणि ओंकार सवई यांचा समावेश आहे. या आरोपींनी आतापर्यंत १९ गंभीर स्वरूपाचे गुन्हे केल्याची पोलीस दफ्तरी नोंद आहे. या संपूर्ण गुन्ह्याचा तपास केल्यानंतर आता आठवले गँगवर मकोका कारवाई करण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ आणि सनी आठवले याची कथित ऑडिओ क्लिप वायरल झाली होती. याच आठवलेवर ही कारवाई करण्यात आली आहे.

दरम्यान, सनी आठवलेने आपल्या फेसबुक अकाऊंटवरुन भलीमोठी पोस्ट करत एक ऑडिओ क्लीप व्हायरल केली होती. त्यामध्ये, पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ आणि वाल्मिक कराडचे संभाषण असून कराडच्या सांगण्यावरुन पोलीस कामकाज करत असल्याचा आरोपी सनी आठवलेने केला होता. आता, त्याच्यावरही मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

## मुंबई - नवी मुंबई विमानतळ मेट्रो मार्गाने जोडले जाणार

**मुंबई**
मुंबई आणि नवी मुंबईसह संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशात अखंड कनेक्टिव्हिटी निर्माण करण्याच्या दिशेने महत्त्वाचे निर्णय घेतले गेले आहेत. यामध्ये मुंबई छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या दोन प्रमुख विमानतळांना मेट्रो मार्ग ८ (सीएसएमआयए ते एनएमआयए) ने जोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा प्रकल्प सार्वजनिक खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर विकसित करण्यास शासनाने तत्वतः मान्यता दिली आहे. या प्रकल्पाच्या सुसाध्यता अहवालाची तयारी सिडकोमार्फत केली जाईल.

## एसटी भाडेवाढ तात्काळ मागे घेण्याची विजय वडेट्टीवारांची मागणी



**मुंबई**
काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी एसटी भाडेवाढीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी भाडेवाढ तात्काळ मागे घेण्याची मागणी केली असून, परिवहन मंत्र्यांनी याबाबत त्वरित आदेश काढावेत, असे मत व्यक्त केले आहे.

वडेट्टीवार म्हणाले, "भाडेवाढ जर परिवहन मंत्र्यांनी केली नाही आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनाही याला विरोध आहे, तर भाडेवाढ तात्काळ रद्द करावी. जर हा निर्णय मंत्र्यांनी घेतलेला नाही, तर मग खाते चालवते कोण? अधिकारी जर खाते चालवत असतील, तर ही एकप्रकारे पोरखेळच आहे."

तसेच, सरकारवर टीका करताना वडेट्टीवार म्हणाले, "सरकारमध्ये गंमत-जंमत सुरू आहे. जर हा निर्णय अधिकाऱ्यांनी घेतला असेल, तर त्यांच्यावर कारवाई केली जाणार का? चांगल्या गोष्टींचं श्रेय घ्यायचं आणि अंगलट आलेल्या गोष्टी अधिकाऱ्यांवर टाकायच्या, ही सरकारची दुटप्पी भूमिका आहे."

त्यांच्या या टीकेमुळे एसटी भाडेवाढीवरून राजकीय वाद अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

## ठाणे महानगरपालिका निवडणुकीसाठी ठाकरे गटाची रणनिती तयार



**मुंबई**
मुंबईनंतर ठाणे महानगरपालिका काबीज करण्यासाठी उद्धव ठाकरे गटाने तयारीला सुरुवात केली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला असलेल्या ठाणे जिल्ह्यावर लक्ष केंद्रीत करत, मातोश्री बंगल्यावर महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत राजन विचारे व ठाण्यातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

मुंबईप्रमाणे ठाण्यातही निरीक्षक नेमण्याची तयारी ठाकरे गटाने केली आहे. पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना स्पष्ट सूचना देत, निवडणूक लढवण्यासाठी सज्ज होण्याचे निर्देश दिले. शिंदे गटाशी टक्कर देण्यासाठी रणनीती आखण्यावर भर देण्यात आला आहे.

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेपासून वेगळे झाल्यानंतर ठाणे जिल्ह्यात मोठी फूट पडली होती, ज्याचा फटका ठाकरे गटाला लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये बसला. त्यामुळे ठाणे महानगरपालिकेसाठी विशेष मोहीम आखत ठाकरेंनी आढावा बैठक घेतली.

शिंदे यांच्या बालेकिल्ल्यात प्रभाव निर्माण करण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संघटन मजबूत करण्याचे आवाहन करण्यात आले. ठाणे महानगरपालिकेत वर्चस्व मिळवण्यासाठी उद्धव ठाकरे गट पूर्ण तयारीला लागल्याचे दिसत आहे.

## वाल्मिक कराडला बीड कारागृहात विशेष वागणूक- जितेंद्र आव्हाड यांची सरकारवर टीका



**मुंबई**
बीडमधील मध्यवर्ती कारागृहात रवानगी झालेल्या कुख्यात गुन्हेगार वाल्मिक कराडला विशेष वागणूक दिली जात असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. त्यांनी याबाबत ट्विट करत सरकारवर तीव्र टीका केली.

वाल्मिक कराडच्या सेवेसाठी बीड कारागृहात सात हवालदार तैनात करण्यात आले असून, कारागृहातील त्याच्या सहकाऱ्यांना मुद्दाम गुन्हे ओढवून कारागृहात पोहोचवले जात असल्याचा आरोप आव्हाड यांनी केला. “गँगमधील गुन्हेगार मुद्दामहून गुन्हे करून स्वतःला कारागृहात पाठवून घेतात आणि तेथूनच रात्री मैफिली रंगतात,” असे त्यांनी म्हटले.

त्यांनी सरकारवर निशाणा साधत म्हटले की, "कायद्याने जामीन नाकारलेल्या गुन्हेगाराला एवढे हवालदार दिमतीला ठेवले जात आहेत, ही महाराष्ट्रासाठी लज्जास्पद बाब आहे. एकंदरीत, तो कारागृहात आहे, अशी भावना निर्माण होऊ नये, याची काळजी सरकार घेत आहे."

"वाल्मिक खडा तो वो सरकारसे बडा," असा उपरोधिक टोला लगावत, आव्हाड यांनी सरकारच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. "थोडी तरी लाज बाळगा," असे म्हणत त्यांनी या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे.

वाल्मिक कराडच्या मुद्द्यावरून राज्यात राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे.

## भाजप- आरएसएसला पारतंत्र्यातील भारत पुन्हा आणायचा आहे- राहुल गांधी



**नवी दिल्ली**
भारताला मिळालेले स्वातंत्र्य हा एक महत्त्वाचा टप्पा होता. कारण त्यानंतर पहिल्यांदाच देशातील दलित, आदिवासी, मागासवर्गीय, अल्पसंख्याक आणि गरिबांना संविधानाद्वारे अधिकार मिळाले. देशाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी तसेच संविधानाची निर्मिती होण्यापूर्वी या देशात गरिबांना कोणतेच अधिकार देण्यात आलेले नव्हते. ही गोष्ट लक्षात ठेवा, असे काँग्रेस खासदार आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी म्हटले आहे.

एका सभेत बोलताना राहुल गांधी पुढे म्हणाले की, गरीब, दलित, मागासवर्गीय, आदिवासी यांना कोणतेही अधिकार नव्हते. केवळ राजे-महाराजे यांनाच अधिकार होते. मात्र, जेव्हा स्वातंत्र्य मिळाले, त्या दिवशी यात बदल झाला. तुम्हाला जमिनी देण्यात आल्या, जमिनीचे हक्क देण्यात आले, अधिकार देण्यात आले, असे राहुल गांधी यांनी सांगितले.

भाजपा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांना स्वातंत्र्यापूर्वी जशी परिस्थिती होती, तशी त्यांना पुन्हा आणायची आहे. पारतंत्र्यात जसे कोणालाही अधिकार नव्हते, फक्त अदानी आणि अंबानी यांसारख्या लोकांना अधिकार होते. पुन्हा तसाच भारत व्हावा, असेच त्यांना कायम वाटते. संघाचे सरसंघचालक मोहन भागवत म्हणाले होते की, ते खरे स्वातंत्र्य नव्हते. कारण भाजप आणि आरएसएस संविधानाला मानत नाहीत. भाजपा आणि संघाला बहुजन आणि गरिबांचे हक्क आणि अधिकार काढून घेऊन त्यांना पुन्हा गुलाम करायचे आहे, असा मोठा दावा राहुल गांधी यांनी केला. हीच लढाई सुरू आहे. तुम्ही मुद्दा लक्षात घ्या. तुम्हाला गुलाम बनवले जात आहे. दलित, मागासवर्गीय, आदिवासी, गरिबांना पुन्हा गुलाम बनवले जात आहे, अशी टीका राहुल गांधी यांनी केली.

दरम्यान, भारतात सध्या विचारधारेचे युद्ध सुरू आहे. एका बाजूला संविधानावर विश्वास ठेवणारी आणि त्यासाठी लढणारी काँग्रेस आणि दुसऱ्या बाजूला आरएसएस-भाजप आहे, जी संविधानाच्या विरोधात आहेत, ती विचारधारा संविधान कमकुवत करू इच्छिते. संविधान हे केवळ एक पुस्तक नाही, त्यात भारताची हजारो वर्षे जुनी विचारसरणी आहे. त्यात आंबेडकर, महात्मा गांधी, भगवान बुद्ध, महात्मा फुले यांसारख्या महापुरुषांचा आवाज आहे. भाजपाने लोकसभा निवडणुकीपूर्वीच राज्यघटना रद्द करण्याची भाषा वापरली होती. आम्हाला ४०० जागा मिळाल्या तर संविधान बदलू, असे ते म्हणाले होते. पण काँग्रेस आणि इंडिया आघाडीचे नेते समोर उभे राहिले. त्याचा परिणाम असा झाला की, नरेंद्र मोदींना लोकसभेत संविधानापुढे झुकावे लागले, या शब्दांत राहुल गांधी यांनी हल्लाबोल केला.

## उद्धव ठाकरे लवकरच फडणवीसांच्या नेतृत्त्वाखाली काम करताना दिसतील - रवी राणा



**मुंबई**
शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी शिंदे गटात उदय होणार आहे. ज्या पद्धतीने राष्ट्रवादी काँग्रेस आणि मूळ शिवसेना तोडण्यात आली. त्याप्रमाणे अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांचा पक्ष तोडला जाईल. भारतीय जनता पक्षाला देशभरात पक्ष तोडण्याची चटक लागली आहे. फक्त इथे नाही, चंद्राबाबू आणि नितीश कुमार यांचा पक्ष देखील तोडला जाईल, असे वक्तव्य केले. यावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय आणि युवा स्वाभीमान पक्षाचे आमदार रवी राणा यांनी संजय राऊत यांच्यावर हल्लाबोल करत खळबळजनक दावा केलाय.

रवी राणा म्हणाले की, संजय राऊत यांना कल्पना नाही. ते आधी सुद्धा अंधारात होते आणि आता सुद्धा ते अंधारात आहेत. उद्धव ठाकरे यांची देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत मोठ्या प्रमाणात छुपी रणनीती सुरू आहे. देवेंद्र फडणवीस हे राज्याचे मुख्यमंत्री आहेत. त्यांचे नेतृत्व उद्धव ठाकरे येणाऱ्या काळात स्वीकारतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे देखील नेतृत्व उद्धव ठाकरे येणाऱ्या काळात स्वीकारणार आहेत. त्या गतीविधीने उद्धव ठाकरेंचे पाऊल टाकणे सुरू आहे, असा दावा त्यांनी केलाय. तसेच उद्धव ठाकरे हे भाजपसोबत दिसतील, त्यावेळी संजय राऊतांना मोठा झटका बसणार आहे, असेही रवी राणा यांनी म्हटले आहे.

## मराठीच्या मुद्द्यावरून डिस्ने हॉटस्टारच्या कार्यालयात मनसैनिकांचा राडा



**मुंबई**
मराठीच्या मुद्द्यावरुन मनसे पुन्हा आक्रमक झालेली पाहायला मिळत आहे. डिस्ने हॉटस्टारच्या ॲपवर क्रिकेट समालोचन मराठीत उपलब्ध नसल्याच्या मुद्द्यावरुन मनसेच्या कार्यकर्त्यांनी थेट कंपनीचं कार्यालय गाठलं आहे. मनसेच्या चित्रपट सेनेचे अध्यक्ष अमेय खोपकर, संतोष धुरी यांनी वरळी येथील हॉटस्टारच्या कार्यालयात जाऊन निषेध नोंदवला. यावेळी कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी देखील केली. कंपनीचे वरिष्ठ अधिकारी भेट देत नसल्याने काही काळ वातावरण तापलं होतं. पण पोलीस फौजफाटा उपस्थित असल्यानं परिस्थिती हाताबाहेर गेली नाही. पोलिसांनी वेळीच परिस्थिती नियंत्रणात आणली आहे. अमेय खोपकर यांनी कंपनीच्या अधिकाऱ्यांना निवेदन देऊन लवकरात लवकर ॲपवर मराठीत समालोचन उपलब्ध करुन द्यावं असं ठणकावून सांगितले. "महाराष्ट्रात राहून इथे व्यवसाय करुन डिस्ने हॉटस्टारच्या ॲपवर क्रिकेटचं समालोचन हिंदी, गुजराती, मल्याळी, तेलुगु, भोजपुरी या सगळ्या भाषांमध्ये उपलब्ध आहे. पण मराठीत उपलब्ध नाही. हे अजिबात चालणार नाही. ही समज नाही तर धमकी समजा. पण मराठीत समालोचन तातडीने उपलब्ध झालं पाहिजे. नाहीतर डिस्ने हॉटस्टारच्या कार्यालयाच्या काचा खूप महाग आहेत हे लक्षात ठेवा", असा आक्रमक पवित्रा यावेळी अमेय खोपकर यांनी घेतला. मनसेचे पदाधिकारी हॉटस्टारच्या अधिकाऱ्यांना भेटण्यासाठी गेले असता बराच वेळ कुणी भेटायला तयार होत नसल्याने कार्यालयात तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. पदाधिकाऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतला होता. धमकीवजा इशारा दिल्यानंतर कंपनीच्या अधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांना भेट दिली. यात अमेय खोपकर यांनी निवेदन देत तातडीने मराठीत समालोचन उपलब्ध करुन देण्याच्या सूचना केल्या आहेत.

# शासकीय कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वय 60 वर्षे करण्याची मागणी

मुंबई..

महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाने राज्यातील सर्व शासकीय कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वय ६० वर्षे करण्याची मागणी पुन्हा एकदा सरकारकडे केली आहे. महासंघाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना याबाबत पत्र देऊन नाराजी व्यक्त केली आहे. महासंघाचे सरचिटणीस समीर भाटकर यांनी सांगितले की, निवृत्ती वय ६० वर्षे करण्यासाठी मंत्रीमंडळाकडे शिफारस करण्यात आली होती, मात्र शासनाकडून होणारी दिरंगाई आणि विलंब अत्यंत निराशाजनक आहे.

महाराष्ट्र शासनातील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे असले तरी, राज्य शासनाच्या पातळीवर हे वय ५८ वर्षे आहे. या बाबीवर लक्ष वेधताना महासंघाने म्हटले आहे की, यापुढे केंद्र शासन आणि इतर राज्यांमध्ये ६० वर्षे निवृत्तीचे वय लागू आहे. या बदलामुळे शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवा अधिक सक्षम होतील, तसेच शासनावर तातडीचा आर्थिक भार कमी होईल.

महासंघाने या मुद्द्यावर आंदोलनाचा इशारा दिला असून, त्यांच्या म्हणण्यानुसार निवृत्ती वय ६० करण्यामुळे राज्याच्या विकासासाठी २५ हजार कोटी रुपयांची रक्कम उपलब्ध होईल.

# फलोदी सट्टा बाजाराच्या अंदाजांनुसार दिल्लीतील राजकीय समीकरणांमध्ये बदलाची शक्यता

मुंबई..

राजस्थानमधील फलोदी सट्टा बाजार आपल्या अचूक अंदाजांसाठी ओळखला जातो. राजकीय घडामोडी आणि निवडणुकीचे निकाल याबाबत वर्तवले जाणारे अंदाज अनेकदा खरे ठरले आहेत. यंदा दिल्ली विधानसभेसाठी देखील फलोदी सट्टा बाजाराने काही महत्त्वाचे अंदाज वर्तवले आहेत, ज्यामुळे दिल्लीतील राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

फलोदी सट्टा बाजाराच्या अंदाजानुसार, आम आदमी पक्षाला या निवडणुकीत नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यांच्या दोन जागा कमी होऊ शकतात, तर भाजपला दोन जागांवर फायदा होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. भाजप 31 ते 33 जागा जिंकण्याच्या स्थितीत असून, ते बहुमताचा आकडा गाठणार नसल्याचा अंदाज आहे. मात्र, भाजप हळूहळू आपली पकड मजबूत करताना दिसत आहे आणि ते एक प्रभावी विरोधी पक्ष म्हणून उदयास येऊ शकतात.

आम आदमी पक्षाला या निवडणुकीनंतर सत्ता टिकवण्यासाठी काँग्रेसची मदत घ्यावी लागू शकते, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. जर भाजपने चांगली रणनीती राबवली, तर सत्ता त्यांच्या हाती येण्याची शक्यता नाकारता येत नाही. दुसरीकडे, काँग्रेसही ही निवडणूक स्वबळावर लढवत आहे, मात्र मुख्य लढत ही आम आदमी पक्ष आणि भाजप यांच्यात होताना दिसत आहे.

या अंदाजांवर विश्वास ठेवायचा की नाही, हे निवडणुकीच्या निकालांनंतरच स्पष्ट होईल. मात्र, फलोदी सट्टा बाजाराच्या अंदाजांमुळे दिल्लीतील निवडणुकीबाबत अधिक उत्सुकता वाढली आहे, आणि दिल्लीच्या राजकीय भवितव्याकडे साऱ्या देशाचे लक्ष लागले आहे.

# 'छावा'तील आक्षेपार्ह नृत्य हटवणार

## दिग्दर्शक उतेकर यांची घोषणा

मुंबई..

छावा चित्रपटातील आक्षेपार्ह नृत्य हटवण्याचा निर्णय या चित्रपटाचे दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांनी घेतला आहे. तत्पूर्वी त्यांनी मनसे प्रमुख राज ठाकरे यांची भेट घेऊन चर्चा केली. इतिहास अभ्यासकांसाठी २९ जानेवारी रोजी मुंबईमध्ये छावाच्या खास शोचे आयोजन करण्यात आले आहे. १४ फेब्रुवारी रोजी हा चित्रपट सर्वत्र प्रदर्शित होणार आहे.

राज ठाकरे यांच्या भेटीनंतर उतेकर म्हणाले, राज ठाकरे यांचे एतिहासिक विषयावरील वाचन चांगले असल्याने त्यांचा सल्ला घेतला. त्यांनी आक्षेप असलेले लेझीम नृत्य काढून टाकण्याचा सल्ला दिला. त्यानंतर नृत्य हटवण्याचा निर्णय घेतला.

हा चित्रपट पूर्णपणे शिवाजी सावंत यांच्या गाजलेल्या छावा कादंबरीवर आधारीत आहे. या कादंबरीचे अधिकृत हक्क मिळवून त्यानंतर हा चित्रपट बनवला. चार वर्षे या चित्रपटावर काम केले. छावा कादंबरीत नमूद आहे की, छत्रपती संभाजी महाराज होळीच्या सणाला होळीच्या आगीतून नारळ काढायचे. लेझीम हा आपला पारंपरिक खेळ आहे. त्यामुळे महाराज कधी तरी लेझीम खेळले नसतील हे कशावरून, असा प्रश्न होता. छत्रपती संभाजी महाराजांनी बुऱ्हाणपूरवर हल्ला केला. त्यानंतर ते रायगडावर आले होते. ते त्यावेळी फक्त २० वर्षांचे होते. ते लेझीम खेळलेही असतील, असे वाटले. मात्र, शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या जात असतील तर हे दृश्य काढून टाकण्यात येईल, असे उतेकर यांनी सांगितले.

# प्रेमीयुगुलाची रेल्वेसमोर उडी घेऊन आत्महत्या

मुंबई..

घरच्यांनी प्रेमाला विरोध केला म्हणून १५ वर्षाच्या मुलीने तिच्या २० वर्षाच्या प्रियकरासोबत विक्रोळी येथे रेल्वेसमोर उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना रविवार दि. २६ रोजी घडली. हे प्रेमी जोडपे भांडुपच्या हनुमाननगर येथे राहणारे होते.

ही मुलगी अल्पवयीन असल्याची माहिती पोलिसांनी दिली असून भांडुप पोलीस ठाण्यात मुलीच्या कुटुंबियानी अपहरणाची तक्रार दाखल केली होती. मुलीच्या कुटुंबाचा या दोघांच्या प्रेमाला विरोध होता, त्यामुळे या दोघांनी टोकाचे पाऊल उचलले अशी शक्यता लोहमार्ग पोलिसांनी व्यक्त केली आहे. नितेश उर्फ लक्की दंडपल्ली (२०) आणि त्याची अल्पवयीन मैत्रीण यांच्यात मागील एक वर्षांपासून प्रेमसंबंध होते. ही बाब महिन्याभरापूर्वी मुलीच्या घरी कळली. त्यांनी या दोघांच्या प्रेमाला विरोध केला, आणि मुलीला घराबाहेर जाण्यास निर्बंध लावण्यात आले होते. २६ जानेवारी रोजी रविवारी सकाळी नऊ वाजण्याच्या दरम्यान मुलगी आजी सोबत औषध घेण्यासाठी घराबाहेर पडली तेव्हा तिला नितेश भेटला आणि आजीला तिने घरी जाण्यास सांगून थोड्या वेळात येते असे सांगून ती नितेशसोबत निघून गेली. मुलीच्या आजीने घरी येऊन मुलगी एका मुलासोबत गेली असल्याचे कुटुंबाला सांगितले. मुलीच्या आईला संशय येताच तिने भांडुप पोलीस ठाणे गाठून अपहरणाची तक्रार दाखल केली. पोलिसांनी नितेश दंडपल्ली याच्या विरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला होता. मात्र याच दरम्यान दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास कुर्ला लोहमार्ग पोलिसांना दोन जणांचे मृतदेह विक्रोळी रेल्वे स्थानकापासून काही अंतरावर आढळले असून राजावाडी रुग्णालय येथे पाठविण्यात आल्याची माहिती भांडुप पोलिसांना दिली. भांडुप पोलिसांकडून दोन्ही मृतदेहांची ओळख पटविण्यात आली.

# घटस्फोटित पत्नीवर चाकू हल्ला करणाऱ्याला जन्मठेप

मुंबई..

वाकोला परिसरात घटस्फोटित पत्नीवर चाकू हल्ला करणाऱ्या पतीला सत्र न्यायालयाने मोठा दणका दिला. सरकारी पक्षाने सादर केलेल्या सबळ पुराव्यांच्या आधारे अतिरिक्त सत्र न्यायाधीश अदिती कदम यांनी ५२ वर्षीय हनीफ सरवर खानला जन्मठेप आणि १० हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली.

२८ जून २०२३ रोजी कलिना येथील सीएसटी रोडवर चाकू हल्ल्याची घटना घडली होती. खानने पत्नी ताहिरापासून घटस्फोट घेतला होता. त्यानंतर आठवडाभराने खानने ताहिरावर चाकूने वार केले होते.

ताहिरा रिक्षातून कामाला जात होती. खानने तिला वाटेत गाठले. जबरदस्तीने रिक्षात प्रवेश केला. रिक्षा कलिना येथे पोहोचल्यानंतर खानने ताहिरावर चाकूने हल्ला केला होता. त्यात ताहिराला गंभीर दुखापत झाली होती. नंतर खानने रिक्षातून उडी मारून पळ काढला होता. या घटनेनंतर ताहिराला ओळखीच्या महिलेने रिक्षातून घरी सोडले होते. तिला कुटुंबीयांनी रुग्णालयात दाखल केले. नंतर ताहिराने पोलिसांत तक्रार दाखल केली होती. त्या तक्रारीच्या आधारे वाकोला पोलिसांनी तपास सुरु केला आणि खानला २३ नोव्हेंबर २०२३ रोजी अटक केली होती. त्याने आपण ताहीरावर चाकू हल्ला केल्याची कबुली दिली. या गुन्ह्यात विशेष सरकारी वकील सीमा देशपांडे यांनी सबळ साक्षी-पुरावे न्यायालयात सादर केले. त्याआधारे अतिरिक्त सत्र न्यायाधीश अदिती कदम यांनी खानला भादंवि कलम ३०७ अन्वये जन्मठेप व १० हजारांचा दंड ठोठावताना भादंवि कलम ३४२ अन्वये अतिरिक्त एक वर्षाच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली.

## संक्षिप्त

### मोबाईल टॉवरविरोधात मनसेचे पालिका उपायुक्तांच्या कार्यालयासमोर आंदोलन

मुंबई

एम पूर्व भागातील गोवंडी, शिवाजीनगर, मानखुर्द परिसरात शेकडो अनधिकृत मोबाईल टॉवर असून त्याबाबत अनेक तक्रारी करूनही पालिकेकडून कोणतीही कारवाई होत नाही. त्याच्या निषेधार्थ चेंबूरच्या एम पश्चिम प्रभागात असलेल्या पालिका उपायुक्तांच्या कार्यालयावर मनसेच्या वतीने निदर्शने करण्यात आली. गोवंडी, शिवाजीनगर, मानखुर्द, ट्रॉम्बे, चित्ताकॅम्प परिसरात २५० हून अधिक अनधिकृत मोबाईल टॉवर आहेत. हे मोबाईल टॉवर घोकादायक अवस्थेत असून झोपड्यांच्या पत्रावर लावले आहेत. याबाबत मनसे उपविभाग अध्यक्ष सतीश वैद्य यांनी अनेक तक्रारी शासन दरबारी केल्या मात्र कोणतीही कारवाई केली नाही. अखेर राज्य मानवाधिकार आयोगाने याची दखल घेऊन पालिकेला कारवाईचे आदेश दिले. मात्र एम पूर्व विभागाने थातुरमातुर कारवाई केली. या भागातील सर्वच अनधिकृत मोबाईल टॉवरवर कारवाई करावी म्हणून मनसेचे सरचिटणीस राजाभाऊ चौगुले, उपाध्यक्ष नवीन आचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली व उपविभाग अध्यक्ष सतीश वैद्य यांच्या नेतृत्वाखाली मनसेच्या कार्यकर्त्यांनी एम पश्चिम कार्यालयाच्या बाहेर आंदोलन करून निदर्शन केली.

### कला, क्रीडा, कार्यानुभव शिक्षकांचे आंदोलन स्थगित

मुंबई

राज्यातील कला, क्रीडा कार्यानुभव शिक्षकांचे पाच दिवसांपासून सुरू असलेले आझाद मैदानातील आंदोलन स्थगित करण्यात आले. शालेय शिक्षण उपसचिव तुषार महाजन यांच्या भेटीत समाधानकारक चर्चा झाल्याने आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय कृती समितीने घेतला आहे, अशी माहिती समिती अध्यक्ष दीपक पवार यांनी दिली. दीपक पवार म्हणाले, राज्यातील शंभर पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या अंशकालीन, अथिती कला, क्रीडा व कार्यानुभव शिक्षक निदेशकांना नियुक्ती मिळावी या मागणीसाठी २० जानेवारीपासून आंदोलन सुरू होते. आंदोलनाच्या पाचव्या दिवशी शुक्रवारी सायंकाळी शिक्षण उपसचिव तुषार महाजन यांची मंत्रालयात भेट घेतली. शंभर पेक्षा कमी पट असलेल्या निदेशकांना व विस्थापितांना त्वरित नियुक्ती द्यावी, सर्वांना नियुक्ती मिळाल्यानंतर ती कायम करावी अशी मागणी समितीने महाजन यांच्याकडे यावेळी केली. त्यावर महाजन यांनी पटसंख्या थोडीफार कमी असेल तर त्यासाठी काही तरतूद करता येईल, असे सांगितले. त्यांच्यासमवेत समाधानकारक व सकारात्मक चर्चा झाली. त्यामुळे आंदोलन स्थगित करण्यात आले.

### डंपरच्या धडकेत महिलेचा मृत्यू

मुंबई, दि. २८ प्रतिनिधी

डंपरची ॲक्टिव्हाला धडक लागून झालेल्या अपघातात मुस्कान मैनुद्दीन सय्यद (३८) या महिलेचा मृत्यू झाला. याप्रकरणी डंपरचालकाविरुद्ध एमआयडीसी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. शनिवारी सकाळी सव्वासात वाजता मुस्कान तिच्या मुलीला शाळेत सोडण्यासाठी गेली होती. ॲक्टिवाने प्रवास करताना तिला एका भरधाव डंपरने घडक दिली. यात जखमी झालेल्या मुस्कानला कूपर रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र तिथे तिला डॉक्टरांनी मृत घोषित केल्याची माहिती पोलिसांनी दिली.

### छोटा राजन टोळीच्या दोघांना अटकपूर्व जामीन

मुंबई

विकासकाकडून १० कोटी रुपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी छोटा राजन टोळीतील मरिना फर्नांडिस आणि क्लेरेन्स जोसेफ रेमेडिओस यांना मुंबईतील सत्र न्यायालयाने नुकताच अटकपूर्व जामीन मंजूर केला. याप्रकरणी गुन्हे शाखेने पाच आरोपींना अटक केली होती. त्यांच्या चौकशीत मरिना आणि क्लेरेन्स या दोघांची नावे पुढे आली होती. त्या पार्श्वभूमीवर दोघांनी सत्र न्यायालयात धाव घेऊन अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. बी. पवार यांच्यासमोर सुनावणी पार पडली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद एकल्यानंतर न्यायालयने दोघांना अटकपूर्व जामीन मंजूर केला. वांद्रे येथील एका ५८ वर्षांच्या महिलेने तिची १३०० चौरस मीटरची मालमत्ता तक्रारदार विकासकाला विकली होती.

### सर्वोत्कृष्ट विद्यार्थी पुरस्काराची घोषणा

मुंबई

सर्वसमावेशक विद्यार्थी केंद्रीत विद्यार्थ्यांचे हित जोपासत मुंबई विद्यापीठामार्फत या शैक्षणिक वर्षापासून सर्वोत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागात आणि संलग्नित महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त शिक्षण संस्थांमध्ये शिकत असलेल्या प्रत्येकी तीन मुले आणि तीन मुलींना सर्वोत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कारांने सन्मानीत केले जाणार आहे. शैक्षणिक उत्कृष्टक्षम प्रतिभावंतांना प्लॅटिनम, डायमंड आणि गोल्डन बॉय्स आणि गोल्डन गर्ल्स अशा पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. यामध्ये प्लॅटिनम पुरस्कारासाठी रुपये १५ हजार सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र, डायमंड पुरस्कारासाठी रुपये १२ हजार सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र आणि गोल्डन पुरस्कारासाठी रुपये १० हजार सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्राचा समावेश आहे. या पात्रतेच्या निकषांव्यतिरिक्त पूर्वीच्या सत्रातील शैक्षणिक कामगिरीचे मूल्यमापन केले जाणार असून त्यासाठी गुणांकन दिले जाणार आहे. आंतरविद्यापीठ आणि राष्ट्रीय स्तरावरील संशोधन कार्याच्या सादरीकरणासाठीचे गुण आदींसह ज्ञानस्त्रोत केंद्रात १ तासाच्या कमीतकमी ३० भेटी अशा विविध काटेकोर निकषांवरून सर्वोत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कारांसाठी विद्यार्थ्यांची निवड केली जाणार आहे.

# अपार आयडीच प्राथमिक ओळखपत्र

मुंबई..

'एक देश एक विद्यार्थी आयडी' या केंद्र सरकारच्या उपक्रमाला प्रत्यक्षात आणण्यासाठी आवश्यक असलेले अपार आयडी केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) संलग्न सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना लागू केले आहे. याचा आढावा घेण्यासाठी आता अपार आयडी मॉनेटरिंग (एआयएम) ही नवी प्रणाली विकसित केली आहे.

नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाशी निगडीत ऑटोमेटेड पर्मनंट अकॅडमिक अकाउंट रजिस्ट्री (अपार) आयडी प्रणाली शिक्षण मंत्रालय राबवत आहे. हा १२ अंकी क्रमांक प्रत्येक विद्यार्थ्यासाठी दिला जाणार आहे. या क्रमांकावर विद्यार्थ्यांची शैक्षणिक आणि शिक्षणेतर उपक्रम यांतील प्रगती नोंदवली जाणार आहे. सीबीएसई बोर्डाशी संलग्न असलेल्या सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे अपार आयडी तयार करण्याबाबत बोर्डाने गांभीर्याने सूचना दिल्या आहेत. तसेच त्यासाठी पालकांना विश्वासात घेतले जावे, असेही या सूचनांमध्ये म्हटले आहे.

पालक-शिक्षक बैठका घेऊन त्यात अपार आयडीची माहिती देणे, तसेच त्यांना संमतीसाठीचे अर्ज देऊन ते पालकांकडून भरून घेणे, हे या प्रक्रियेतील महत्त्वाचे टप्पे आहेत. पालकांनी अपार आयडीसाठीचे अर्ज भरून दिल्यानंतर विद्यार्थ्यांचे नाव, जन्मतारीख, आधार क्रमांक आदी अत्यावश्यक तपशील शाळांनी यूडायस प्रणालीवरून तपासून घेणे आवश्यक आहे. याच प्रणालीच्या मदतीने नंतर अपार आयडी तयार होणार असून ते विद्यार्थ्यांच्या डिजिलॉकरशी संलग्न होणार आहेत. तसेच प्रत्येक शाळेने हे अपार आयडी विद्यार्थ्यांना आणि पालकांना द्यावेत.

प्रत्येक विद्यार्थ्याच्या ओळखपत्रावरही अपार आयडी क्रमांक नोंदवावा, असेही या सूचनापत्रात सीबीएसईने नमूद केले आहे. सदर प्रक्रिया व्यवस्थित पार पडते आहे अथवा नाही, हे तपासण्यासाठी सीबीएसई बोर्डाने आपली स्वतःची 'अपार आयडी मॉनेटरिंग' ही प्रणाली विकसित केली आहे. शाळांनी नेमाने या सर्व प्रक्रियेची माहिती संबंधित प्रणालीवर अद्ययावत ठेवावी, असेही निर्देश या मंडळाने दिले आहेत.

# माहीम-वांद्रेदरम्यानच्या पुलाचे पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण

मुंबई..

माहीम ते वांद्रे स्थानकांदरम्यानच्या पूल क्रमांक २० मधील ब्रिटिशकालीन स्क्रू पायलिंग हटवून पूलाला आरसीसी बांधकामाच्या मजबूतीकरणाच्या पहिल्या टप्याचे काम शुक्रवार आणि शनिवार अशा दोन रात्रकालीन ब्लॉकमध्ये पूर्ण झाले आहे. दुसऱ्या टप्प्यासाठी आता मे महिन्यात ब्लॉक घेण्यात येणार आहे. तोपर्यत लोकल वेगमयदिसह धावणार आहेत. पूल मजबूतीकरणाच्या पहिल्या टप्प्यात २०.४ मीटर लांबीचे, ४२ टन वजनाचे ४ गर्डर हटवण्यात आले. गर्डर हटवण्यासाठी केवळ एकच बाजू उपलब्ध होती. त्यामुळे दोन्ही टप्प्यात धीम्या आणि जलद मार्गावर ब्लॉक घेऊन वाहतूक बंद केली होती. एका बाजूला नदीचे पात्र असल्याने अतिशय आव्हानात्मक परिस्थितीत ७०० टन वजनी क्रेनच्या मदतीने हे काम पूर्ण करण्यात आले. सध्या दोन्ही



मार्गांवर तात्पूरते गर्डर उभारले आहे. नदीच्या पात्रात तात्पूरते छोट्या आकाराचे धरण बांधून पाण्याचा प्रवाह अडवण्यात येणार आहे. त्यानंतर आरसीसी बांधकाम करण्यात येईल. नदीच्या प्रवाह वाहता असल्याने हे काम आव्हानात्मक आहे. तात्पूरते गर्डर हटवण्यासाठी मे महिन्यात दोन दिवस रात्रकालीन ब्लॉक घेऊन त्या ठिकाणी कायमस्वरुपी गर्डर उभारण्यात येणार आहेत, असे पश्चिम रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# नीट यूजीची परीक्षा पुन्हा जुन्या पद्धतीनुसार होणार

मुंबई..

कोरोना कालावधीमध्ये विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेत परीक्षेचे स्वरूप बदलण्यात आले होते. मात्र आता परीक्षा जुन्याच पद्धतीनुसार घेण्याचा निर्णय राष्ट्रीय परीक्षा एजन्सीकडून (एनटीए) घेतला आहे.

परीक्षेतील पर्यायी प्रश्न वगळण्यात आले असून, प्रश्नपत्रिका १८० प्रश्नांची असणार आहे. ही प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी विद्यार्थ्यांना तीन तासांची वेळ दिली जाणार आहे.


कोरोना कालावधीमध्ये विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेत राष्ट्रीय परीक्षा एजन्सीने नीट यूजीच्या परीक्षेत बदल करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार नीट यूजीच्या परीक्षेमध्ये 'अ' व 'ब' असे दोन विभाग करण्यात आले होते. 'अ' विभागामध्ये ३५ अनिवार्य प्रश्न होते, तर 'ब' विभागामध्ये १५ पर्यायी प्रश्न होते. आता मात्र यात बदल करत परीक्षा मूळ पद्धतीने घेण्याचा एनटीएने निर्णय घेतला आहे.

या पद्धतीमध्ये प्रश्नपत्रिकेतून 'ब' विभाग काढून टाकण्यात येणार असल्याने पर्यायी प्रश्न नव्या प्रश्नपत्रिकेतून वगळण्यात येणार आहे. त्यामुळे यापुढे नीट यूजीची परीक्षा १८० अनिवार्य प्रश्नांची असणार आहे. यामध्ये भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्रातील प्रत्येकी ४५ प्रश्न आणि जीवशास्त्रातील ९० प्रश्न असणार आहेत.

# जेव्हीएलआर रस्ता रुंदीकरण मार्चमध्ये

मुंबई..

मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्रांतील जोगेश्वरी विधानसभा क्षेत्राअंतर्गत येणाऱ्या जोगेश्वरी विक्रोळी लिंक रोड (जेव्हीएलआर) येथील श्यामनगर ते पश्चिम द्रुतगती महामार्ग पर्यंतच्या रस्ता रुंदीकरणाचे रखडलेले काम मार्चमध्ये सुरू करण्यात येणार असल्याची माहिती मुंबई महापालिकेच्या के पूर्व विभागातील अधिकाऱ्यांनी दिली. भविष्यातील जोगेश्वरी विक्रोळी लिंक रोडवरील होणारी वाहतुकीची होणारी कोंडी लक्षात घेऊन खासदार रवींद्र वायकर यांनी पालिकेच्या स्थायी समितीवर असताना त्यांनी जोगेश्वरी विक्रोळी लिंक रोडच्या रुंदीकरणाचे काम सुरू केले. हे काम श्यामनगर तलावापर्यंत पूर्ण करण्यात आले; परंतु काही तांत्रिक अडचणीमुळे तसेच मेट्रोच्या कामामुळे श्यामनगर ते पश्चिम द्रुतगती महामार्ग या रस्ता रुंदीकरणाचे काम रखडले होते. खासदार रवींद्र वायकर यांनी हे काम सुरू करण्यासाठी मेट्रो आणि मुंबई महापालिकेचे अधिकारी यांच्यासमवेत बैठकाही घेतल्या



होत्या. या बैठकीमुळे येथील उर्वरित रस्ता रुंदीकरणाचे काम लवकरच सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

श्यामनगर ते पश्चिम द्रुतगती महामार्गपर्यंतच्या रस्त्याची लांबी ८०० मीटर आहे. याठिकाणी दक्षिण भागात ५६ बांधकामे तर उत्तरेकडे ९६ बांधकामे बाधित होणार आहे. सुरुवातील दक्षिण भागातील रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम करण्यात येणार असून यासाठी ५६ बांधकामाना (प्रकल्पबाधित) नोटीसा महानगर पालिकेमार्फत देण्यात येणार आहे. या कामाचे ड्राफ्ट अनेक्स्चर तयार असून अंतिम यादी बनवण्याचे काम प्रगतिपथावर असून हे काम येत्या २० दिवसाममध्ये पूर्ण करण्यात येणार आहे. रस्ता रुंदीकरणाचे काम टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात येणार असून दक्षिण भागाचे काम पूर्ण झाल्यावर उत्तर भागाच्या रुंदीकरणाचे काम हाती घेण्यात येणार आहे. पालिका रस्ता रुंदीकरणाच्या कामात अडथळा ठरणारी बांधकामे काढणार असून मेट्रो रस्ता रुंदीकरणाचे काम पूर्ण करणार आहे, अशी माहित मुंबई महानगर पालिकेच्या के पूर्व विभागातील दुय्यम अभियंता सोनावणे यांनी दिली. मार्च २०२५ पासून या कामाला सुरुवात होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

### मुंबई विद्यापीठात सामाजिक विषयावर एकदिवसीय परिषद

मुंबई

सामाजिक शास्त्रातील संशोधन हे जीवनाच्या जवळ आणि व्यक्ती व समाज यांचा आरसा असावा अशी अपेक्षा असल्याने समाजातील खरे प्रश्न आणि त्यांची वस्तुनिष्ठ उत्तरे ही या संशोधनातून पुढे यायला हवीत तसेच अशा प्रश्नांची उकल या संशोधनातून व्हावी असा मान्यवरांचा सूर एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेत उमटला. सामाजिक शास्त्र दैनंदिन जीवनात स्पर्श करीत असल्याने विद्यार्थी व संशोधकांनी एक वेगळी वाट चोखाळली तर संशोधन अर्थपूर्ण व उपयोगाचेही होईल असेही प्रतिपादन मान्यवरांनी केले. मुंबई विद्यापीठ, भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद पश्चिम विभागीय केंद्र आणि राष्ट्रीय सेवा भारतीच्या सहयोगाने आयोजित केलेल्या एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेत मान्यवरांनी त्यांची मते मांडली.

'इन्वेस्टिगेटींग द इम्पॅक्ट ऑफ सोशिओ इकोनॉमिक एन्व्हार्यनमेंट ऑन एकेडमिक रिसर्च अँड आऊटकम्सः अ पॉलिसी ओरिएन्टेड एप्रोच' या संकल्पनेवर ही परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेमध्ये पद्मश्री गिरीश प्रभुणे, पद्मश्री जे. के. बजाज, आयसीएसएसआर चे सदस्य सचिव प्रा. धनंजय सिंह, राष्ट्रीय सेवा भारतीचे विजयराव पुराणिक, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र. कुलगुरु प्राचार्य डॉ. अजय भामरे, भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद पश्चिम विभागीय केंद्राच्या संचालिका प्रा. कविता लघाटे, पश्चिम सेवा क्षेत्र प्रमुख प्रा. उपेंद्र कुलकर्णी, सेंट्रल युनिव्हर्सिटी अजमेर, राजस्थान येथील प्रा. मकरंद पैठणकर आणि प्रा. भारती गोरे दिल्ली विश्वविद्यालय यांचे मार्गदर्शन लाभले.

# कर्करोगाच्या उपचारांसाठी डम्पिंग ग्राउंडची जागा द्या

## आ. मिलिंद नार्वेकर यांची मागणी

मुंबई..

मुलुंडमध्ये ४५ एकरांवर असलेल्या निष्क्रिय डम्पिंग ग्राउंडची जागा ओसाड पडली आहे. अत्याधुनिक नेत्रचिकित्सा किंवा कर्करोगावरील उपचारांवरील जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी ही जागा रिलायन्स फाउंडेशन, फोर्टिस, लीलावती, शंकर नेत्रालय किंवा अशा कोणत्याही मोठ्या संस्थेला भाड्याने देण्यात यावी, अशी मागणी उद्धवसेनेचे आ. मिलिंद नार्वेकर यांनी सोमवारी केली.

वांद्रे पूर्व येथील उत्तर भारतीय संघ सभागृहात मुंबई उपनगर जिल्हा नियोजन समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. मुंबई उपनगरचे पालकमंत्री माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार आणि सहपालकमंत्री कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक संपन्न झाली. मुंबई उपनगर जिल्ह्यातील खासदार, आमदार, जिल्हा नियोजन समितीवरील नामनिर्देशित तसेच विशेष निमंत्रित सदस्य, मनपा आयुक्त भूषण गगराणी यावेळी उपस्थित होते.

आ. मिलिंद नार्वेकर यांनी आरोग्यसेवेच्या पायाभूत सुविधांबाबत कोरोना काळात सेव्हन हिल्स हॉस्पिटलने दिलेल्या योगदानाचा उल्लेख केला. मुंबईकरांना परवडणारी आरोग्यसेवा देण्यासाठी रिलायन्स फाउंडेशन आणि सेव्हन हिल्स हॉस्पिटल यांच्यासोबत संयुक्त उपक्रम राबविण्यात यावेत, असा प्रस्ताव मांडला

# मोटार न्यायाधिकरणातील रिक्त पदे कधी भरणार ? : हायकोर्ट

मुंबई

उच्च न्यायालयाने मोटार अपघात दावा न्यायाधिकरणातील रिक्त पदे भरण्यासाठी कोणती पावले उचलली?, त्यासाठी काय प्रयत्न केले, अशी विचारणा सोमवारी उच्च न्यायालयाने राज्य सरकारला केली. तसेच त्यासंदर्भात प्रतिज्ञापत्राद्वारे भूमिका स्पष्ट करण्याचे आदेशही दिले. मोटार वाहन न्यायाधिकरणाच्या दाव्यांमध्ये जलदगतीने निर्णय घेणे आवश्यक आहे आणि जोपर्यंत मोटार अपघात दाव्यांच्या न्यायाधिकरणात पुरेशा पायाभूत सुविधा उपलब्ध होत नाहीत. तोपर्यंत मोटार अपघातातील पीडितांना जलद गतीने न्याय मिळण्याचे स्वप्न प्रत्यक्षात येऊ शकणार नाही, असेही निरीक्षण मुख्य न्या. आलोक अराधे आणि न्या. भारती डांगरे यांच्या खंडपीठाने उपरोक्त आदेश देताना नोंदवले. न्यायालयाने आदेश देऊन एक वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. गेल्या वर्षभरात तुम्ही काय केले?, याची माहिती न्यायालयात सादर करा. मोटार वाहन कायद्यानुसार, प्रलंबित दाव्यांवर विशिष्ट कालबद्ध पद्धतीने निर्णय घेण्याची तरतुद आहे. सरकारने १३ फेब्रुवारी २०२३ रोजी प्रतिज्ञापत्र दाखल केले होते. त्यानंतर रिक्त पदं भरण्यासाठी काय प्रयत्न केले. मोटार अपघात दावे न्यायाधिकरणातील रिक्त पदांवर प्रकाश टाकणारी याचिका



२०२२ मध्ये मोटार अपघात दावे न्यायाधिकरणाच्या बार असोसिएशनच्या वतीने उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. न्यायाधिकरणातील रिक्त पदं तातडीने भरण्याचे आदेश राज्य सरकारला देण्याची मागणी याचिकेतून केली आहे. २६ एप्रिल २०२३ रोजी न्यायालयाने राज्य सरकारला रिक्त पदे भरण्यासाठी उचललेल्या पावलांवर प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते. रिक्त पद भरण्याच्या दृष्टीने पावले उचलण्यात आल्याची माहिती राज्य सरकारच्या वतीने वकिलांनी प्रतिज्ञापत्राद्वारे दिली होती. तथापि, याचिकाकर्त्यांनी त्यांच्या प्रतिज्ञापत्रात यावर आक्षेप घेतला होता. त्याबाबतचा प्रगती अहवाल प्रतिज्ञापत्राद्वारे सादर करण्याचे आदेश सरकारला देऊन खंडपीठाने सुनावणी २७ फेब्रुवारीला ठेवली.

# जीबीएस आजाराबाबत सरकार सतर्क : प्रकाश आबिटकर

मुंबई..

पुण्यात जीबीएस (गुइलेन-बार्रे सिंड्रोम) या आजाराचे १११ संशयित रुग्ण आढळल्याने राज्य सरकारने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज या विषयावर चर्चा करत परिस्थितीचा आढावा घेतला.

प्रकाश आबिटकर म्हणाले की, "जीबीएस हा आजार नवीन नाही. अनेक वर्षांपासून हा आजार अस्तित्वात आहे. मात्र, पुण्यात वाढलेल्या रुग्णसंख्येमुळे हा मुद्दा आता समोर आला आहे. पाण्यातून हा आजार होतो असल्याचे कळते आहे. त्यामुळे जलप्रदूषण ही एक गंभीर समस्या बनली आहे."

या आजाराचा सामना करण्यासाठी प्रशासनाने जिल्हा रुग्णालयांमध्ये विशेष तयारी केली आहे. रुग्णांवर उपचारासाठी सर्व औषधे उपलब्ध करून दिली आहेत. "रुग्णांना सरकारी रुग्णालयात उपचार घ्यावे लागतील, आणि गरजू रुग्णांना चार लाखांपर्यंतची आर्थिक मदत देण्याची सरकारची योजना आहे," असे आबिटकर यांनी स्पष्ट केले.

जीबीएस आजाराच्या नियंत्रणासाठी राज्यातील सर्व रुग्णालयांना योग्य सूचना देण्यात आल्या आहेत. "पाणीपुरवठा करणाऱ्या टँकरवर देखरेख ठेवण्याचे आदेश दिले आहेत. तसेच पाण्याच्या स्वच्छ वापरासाठी नागरिकांना जबाबदारीचे प्रशिक्षण देण्यावर भर दिला जात आहे," असेही त्यांनी नमूद केले.

"रुग्णसंख्या वाढल्याने आम्ही जास्त काळजी घेत आहोत. या आजारावर नियंत्रण मिळवण्यासाठी सरकार योग्य पद्धतीने काम करत आहे," असे आश्वासनही आबिटकर यांनी दिले.



*कोरेगाव (जि. सातारा) तालुक्यातील रस्त्यांच्या कामांचा आढावा घेण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात उपमुख्यमंत्री कार्यालयातील समिती सभागृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कोरेगावचे आमदार महेश शिंदे, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव तथा विकास आयुक्त डॉ. राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओमप्रकाश गुप्ता, ग्रामविकास (रस्ते) विभागाचे सचिव सतीश चिखलीकर, सार्वजनिक बांधकाम (रस्ते) विभागाचे सचिव सदाशिव साळुंके, साताऱ्याचे जिल्हाधिकारी संतोष पाटील (व्हिसीद्वारे), सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन (व्हिसीद्वारे), राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक संजय कदम, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे मुख्य अभियंता साहेबराव सुरवसे, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे अधिक्षक अभियंता राहुल वसईकर, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना व मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेचे कार्यकारी अभियंता युवराज देसाई उपस्थित होते.*



*देशाच्या 76 व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी महाराष्ट्र राजभवन येथे राष्ट्रध्वज फडकावून ध्वजाला मानवंदना दिली. राष्ट्रगीत तसेच राज्यगीत झाल्यानंतर राज्य राखीव पोलीस दल व महाराष्ट्र पोलीस दलातर्फे सलामी देण्यात आली. राज्यपाल राधाकृष्णन यांनी पत्नी सुमती यांचेसह राजभवनातील अधिकारी व कर्मचारी तसेच पोलीस अधिकारी व उपस्थित लहान मुलांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या तसेच मिठाई वाटप केले.*

## प्रजासत्ताक दिनानिमित्त मुंबई उपनगर पालकमंत्री ॲड.आशिष शेलार यांच्या हस्ते ध्वजवंदन



**मुंबई**

भारताच्या 76 व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा सांस्कृतिक कार्य, माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड.आशिष शेलार यांच्या हस्ते आज दिमाखात ध्वजवंदन करण्यात आले.

वांद्रे पूर्व येथील मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात झालेल्या या समारंभास आमदार वरुण सरदेसाई, मुंबई उपनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, अतिरिक्त पोलिस आयुक्त परमजीत सिंग दहिया, पोलिस उपआयुक्त मनिष कलवानिया यांनी सलामी दिली.

या कार्यक्रमास माजी आमदार झिशान सिद्दिकी, ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी, शहीद परिवाराचे कुटुंबिय, शासकीय अधिकारी, पोलिस, क्रीडा मार्गदर्शक क्रीडा पटू, विद्यार्थी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने पालकमंत्री ॲड.शेलार यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय खो खो क्रीडा स्पर्धेत प्राविण्य मिळालेल्या प्रशिक्षक, खेळाडू तसेच गुणवंत मार्गदर्शक व क्रीडापटू यांचा सत्कार करण्यात आला. यात केनिया पुरुष व स्त्री खो-खो संघाचे मुख्य प्रशिक्षक डॉ.नरेंद्र विठ्ठल कुंदर, खो-खो विश्वविजेत्या भारतीय संघामध्ये प्रतिनिधीत्व केलेले अनिकेत भगवान पोटे यांचा समावेश होता. त्याचप्रमाणे, सन 2022- 23 या वर्षांकरिता क्रीडा मार्गदर्शक रमेश सकट, खेळाडू जान्हवी जाधव, अमन सिंग, रितिका महावर, अक्षता ढोकळे, प्रशांत गोरे, आदित्य खामसे आणि रितेश बोराडे यांना गुणवंत खेळाडू क्रीडा पुरस्कार देण्यात आले. सन 2023- 24 या वर्षाकरिता क्रीडा मार्गदर्शक योगेश पवार, खेळाडू निधी राणे, अभिषेक प्रसाद, आंचल गुरव, अर्ना पाटील, आकाश गोसावी आणि नमन महावर यांना गुणवंत खेळाडू क्रीडा पुरस्कार देण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महात्मा गांधी विद्यालयाचे शिक्षक राहुल प्रभू यांनी केले.

## लोककल्याणाचा विचार डोळ्यासमोर ठेवून विधानमंडळाची वाटचाल -सभापती प्रा. राम शिंदे



**मुंबई**

भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त विधान भवन, मुंबई येथे विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी ध्वज फडकवून राष्ट्रध्वजाला वंदन केले. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. आपले विधानमंडळ लोककल्याणाचा विचार दीपस्तंभाप्रमाणे डोळ्यासमोर ठेवून वाटचाल करीत आहे, असे सांगून सभापती प्रा. शिंदे यांनी विधानमंडळाचे काम अधिक प्रभावी होण्यासाठी प्रश्नोत्तराचा तास विनाव्यत्त्यय होणे, समिती पद्धत अधीक सक्षम करणे, चर्चेनंतरच विधेयक संमत होणे आणि अर्थसंकल्पीय बाबींवर सदस्यांना मार्गदर्शन, ही आपली पीठासीन अधिकारी म्हणून कामकाज अग्रक्रमासाठी चतु:सुत्री राहील, असे यावेळी स्पष्ट केले. भारतीय प्रजासत्ताक आणि भारतीय राज्यघटना अमृत महोत्सवाच्या सर्वांना शुभेच्छा देत राज्यघटनेमुळे भारतातील संसदीय लोकशाही वैश्विक स्तरावर अधिक प्रभावी आणि प्रगल्भ झाल्याचे त्यांनी सांगितले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा लोककल्याणकारी राज्य संकल्पनेचा विचार पुढे नेला. त्यांच्या जन्म त्रिशताब्दीनिमित्त प्रा. राम शिंदे यांनी अभिवादन केले.

याप्रसंगी विधानमंडळ सचिवालयाचे सचिव (१) (कार्यभार) जितेंद्र भोळे, सचिव (२) (कार्यभार) डॉ. विलास आठवले यांच्यासह अधिकारी आणि कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा



**मुंबई**

भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त कौशल्य, रोजगार, उद्योगकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर येथे झालेल्या शासकीय सोहळ्यात राष्ट्रीय ध्वज फडकवून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. यावेळी जिल्हाधिकारी रवि कटकधोंड, निवासी उपजिल्हाधिकारी जयराम कारभारी, उपजिल्हाधिकारी गणेश सांगळे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी उपस्थित स्वातंत्र्य सैनिक, नागरिक, अधिकारी, कर्मचारी यांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हा सैनिक कार्यालयामार्फत वीर पत्नी यांचा सत्कार मंत्री श्री. लोढा यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच विविध विभागातील वैशिष्ट्यपुर्ण कार्य केलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचाही सत्कार यावेळी करण्यात आला.

## संक्षिप्त



*भारताच्या ७६व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी ध्वज फडकवून भारतीय तिरंग्यास वंदन केले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांसह राज्यातील जनतेला प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी महाराष्ट्र पोलीस दलाच्यावतीने राष्ट्रगीत व राज्यगीत सादर करून राष्ट्रध्वजास सलामी देण्यात आली. यावेळी अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.*

### प्रजासत्ताक दिनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा 'डेडिकेटेड टू कॉमन मॅन' बाणा

**मुंबई**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रजासत्ताक दिनी पुन्हा एकदा आपल्या संवेदनशील स्वभावाचा परिचय करून दिला. ठाण्यातील साकेत मैदानात ध्वजवंदन कार्यक्रम पार पडल्यानंतर मुंबईकडे येत असताना त्यांनी आपल्या ताफा थांबवत दुचाकी अपघातात जखमी झालेल्या तरुणाला मदत केली. त्यांच्या या तत्परतेमुळे एका जखमी व्यक्तीला तातडीने उपचार मिळाले.

अपघाताची घटना ठाण्यावरून मुंबईला येताना पूर्व द्रुतगती महामार्गावर घाटकोपरजवळ घडली. एक दुचाकीस्वार अपघात होऊन गंभीर जखमी झाला होता. ताफ्यातून जात असताना शिंदेंनी ही घटना पाहताच तातडीने ताफा थांबवला आणि गाडीतून उतरून तरुणाची विचारपूस केली. त्या तरुणाच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याचे पाहताच त्यांनी तत्काळ आपल्या ताफ्यातील गाडी आणि पोलिसांच्या मदतीने त्याला रुग्णालयात पाठवले. जखमी तरुणाला राजावाडी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तरुणाला धीर देत शिंदे म्हणाले, "काळजी करू नकोस, तू लवकर बरा होशील." त्यांच्या या कृतीने 'डेडिकेटेड टू कॉमन मॅन' बाणा पुन्हा एकदा अधोरेखित झाला. शिंदे नेहमीच "मी मुख्यमंत्री म्हणजे 'कॉमन मॅन' आहे," असे सांगत असतात. उपमुख्यमंत्री म्हणून त्यांनी घेतलेली तातडीची मदत करण्याची भूमिका सामान्य नागरिकांसाठी त्यांच्या निष्ठेचे प्रतीक बनली आहे.

### लीलावती रुग्णालयात कॅन्सर केअर इन्स्टिट्यूट

**मुंबई**

लीलावती हॉस्पिटल आणि अमेरिकेतील मेयो क्लिनिकसोबत करार करून सुरू केलेले कर्करोग रुग्णालय एक 'आरोग्य मंदिर' आहे. परिचारिका या आमच्या लाडक्या बहिणी असून त्यांना मेयो क्लिनिककडून विशेष प्रशिक्षण दिले जाईल. मला आशा आहे की त्या कौशल्य आणि तंत्रांसह जगातील सर्वोत्तम परिचारिका ठरतील. नर्सिंग कर्मचारी हे आरोग्यसेवेतील अत्यंत महत्त्वाचा घटक असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. लीलावती रुग्णालयाचे नवीन कॅन्सर केअर इन्स्टिट्युटच्या उद्घाटनाप्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, कॅन्सर केअर इन्स्टिट्युट कर्करोगाच्या वेळीच आणि अचूक निदानासाठी, रुग्णांच्या प्रकृतीत सुधार आणण्यासाठी आणि मृत्यू दर कमी करण्यासाठी एआय-तंत्रज्ञानाचा वापर करेल. ३०० खाटांच्या या कर्करोग रुग्णालयामुळे कर्करोगग्रस्त रुग्णांची सोय होणार आहे. यावेळी सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, माहिती व तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, वाहतूकमंत्री प्रताप सरनाईक, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, मेयो क्लिनिकचे आंतरराष्ट्रीय आणि एंटरप्राइज ऑटोमेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी बिजू सॅमकुट्टी, लीलावती हॉस्पिटलच्या संस्थापक आणि स्थायी विश्वस्त चारू मेहता, स्थायी विश्वस्त राजेश मेहता, प्रशांत मेहता, राजीव मेहता उपस्थित होते.

### पश्चिम, पूर्व उपनगरांतील विकास कामांसाठी ८६५.७१ कोटींची तरतूद

**मुंबई**

यंदाच्या जिल्हा नियोजन समितीला राज्य शासनाने दिलेल्या किमान नियतव्यय मर्यादानुसार सन २०२५ २६ साठी पश्चिम आणि पूर्व उपनगरांतील विविध विकास कामांसाठी ८६५.७१ कोटीची तरतूद करण्यात आली आहे. जिल्हा नियोजन समितीची सोमवार, २७ जानेवारी रोजी सांताक्रुज येथील उत्तर भारतीय हॉल सभागृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीला पूर्व आणि पश्चिम उपनगरांतील खासदार, आमदार, पालिका, जिल्हाधिकारी, एसआरए, म्हाडा, पोलीस, क्रिंडा विभागातील प्रशासकीय अधिकारी आणि समितीमधील सदस्य उपस्थित राहणार आहेत.

### मुंबई महापालिकेत अभियांत्रिकी संवर्गातील ६९० रिक्त पदांवर भरती

**मुंबई**

मुंबई महापालिकेत अभियांत्रिकी संवर्गातील ६९० रिक्त पदांवर सरळसेवेने भरती करण्याचा निर्णय पालिकेच्या नगर अभियंता मध्यवर्ती विभागाने घेतला आहे. यासाठी फेब्रुवारी महिन्यांपासून ऑनलाईन परिक्षा घेण्यात येणार आहे. पालिकेच्या नगर अभियंता खात्याच्या आस्थापनेवरील विविध अभियांत्रिकी संवर्गातील ६९० रिक्त जागेवर हो भरती होणार आहे. यामध्ये दुय्यम अभियंता (यांत्रिकी व विद्युत), कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी व विद्युत), कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) आणि दुय्यम अभियंता (स्थापत्य) आदीं विभागासाठी ही ऑनलाईन भरती आहे. राज्यातील विविध परिक्षा केंद्रावर ऑनलाईन परीक्षा आयोजित करण्यात येणार आहे.

## महापारेषणमध्ये 76 वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



**मुंबई, दि. २७ प्रतिनिधी**

महापारेषणचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगंगा येथे भारताचा ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच महापारेषणच्या सात परिमंडळ कार्यालयांमध्येही प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम घेण्यात आले. प्रकाशगंगा येथील मुख्यालयात महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण यांनी ध्वजवंदन केले. यावेळी महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, मुख्य अभियंता श्रीमती जुईली वाघ, श्री. सुनील सूर्यवंशी, श्री. पीयूष शर्मा, श्री. महेंद्र वाळके, श्री. भूषण बल्लाळ, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्रीमती अंजू गुप्ता, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. कैलास कणसे, उपमुख्य सुरक्षा व अंमलबजावणी अधिकारी श्री. किशोर पाटील, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, उपमहाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. नितीन कांबळे, श्री. अभय रोही, अधीक्षक अभियंता श्री. विशाल वाघचौरे, शिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव, जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दादरच्या शिवाजी पार्कवर झालेल्या चित्ररथाच्या सादरीकरणावेळी महापारेषणच्या (ऊर्जा विभाग) चित्ररथाने सर्वांचे लक्ष वेधले. विशेषतः मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.०., पारेषणचे वहन, नविनीकरणीय ऊर्जा या थीमवर असलेल्या चित्ररथाने उपस्थितांची वाहवा मिळविली. ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव श्रीमती आभा शुक्ला व महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली हा चित्ररथ तयार करण्यात आला. याप्रसंगी महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील व शिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव उपस्थित होते.

## मतदारांची माहिती लपवणे लोकशाहीसाठी धोकादायक – नाना पटोले



**मुंबई, दि. २७ प्रतिनिधी**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी भाजप सरकार आणि निवडणूक आयोगावर गंभीर आरोप करत मतदारांच्या अधिकारांवर दरोडा टाकल्याचे वक्तव्य केले. प्रजासत्ताक दिनानिमित्त काँग्रेस मुख्यालय टिळक भवन येथे झालेल्या कार्यक्रमात पटोले यांनी देशातील लोकशाही धोक्यात असल्याचा इशारा दिला.

नाना पटोले म्हणाले की, “आपल्या पूर्वजांनी बलिदान देऊन आपल्याला स्वातंत्र्य आणि लोकशाही दिली आहे. परंतु भाजप सरकार आणि निवडणूक आयोगाच्या मदतीने लोकशाहीच्या मूल्यांची पायमल्ली केली जात आहे. निवडणूक प्रक्रियेत मतदार याद्या, मतदान आणि मतमोजणीत मोठ्या प्रमाणात घोटाळे करण्यात आले आहेत. काँग्रेसने निवडणूक आयोगाकडे याबाबत माहिती मागितली, परंतु आयोगाने ती माहिती न देत डेटा डिलीट केल्याचा गंभीर प्रकार घडला आहे. हा प्रकार लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे.”

**शेतकऱ्यांची कर्जमाफी आणि भाजपचा दुटप्पीपणा**

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत भाजप सरकारने गंभीर दुटप्पीपणा दाखवला असल्याचा आरोपही पटोले यांनी केला. “सरकारकडे शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी निधी नाही, पण बगलबच्च्यांच्या साखर कारखान्यांचे १०० कोटींचे व्याज माफ करण्यासाठी पैसा आहे. जनतेला महागाईच्या संकटात ढकलत एसटी, रिक्षा, टॅक्सीचे भाडेवाढीस परवानगी दिली जाते. हे सरकार जनतेच्या हिताएवजी मूठभर धनदांडग्यांचे सरकार आहे,” असे त्यांनी म्हटले.

**केजरीवालांना मर्यादा पाळण्याचा इशारा**

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी काँग्रेस नेत्यांविरोधात अपप्रचार केल्याबद्दल पटोले यांनी कठोर शब्दांत टीका केली. “मल्लिकार्जून खर्गे आणि राहुल गांधी यांच्याबद्दल बोलताना केजरीवाल यांनी औकातीत राहावे. बेईमान कोण आणि भाजपची बी टीम कोण, हे देशातील जनतेला चांगले ठाऊक आहे,” असे त्यांनी सुनावले.

कार्यक्रमाला काँग्रेसचे सीडब्ल्यूसी सदस्य नसीम खान, प्रदेश कार्याध्यक्ष विलास औताडे, वरिष्ठ नेते हुसेन दलवाई यांसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. पटोले यांनी प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देत लोकशाही व संविधानाच्या रक्षणासाठी काँग्रेस लढत राहील, असे ठाम मत व्यक्त केले.

# आघाडीचे 100 पराभूत उमेदवार न्यायालयात

## काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांची माहिती

**मुंबई**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीवेळी मतदार याद्यांमधील घोळ हा एक महत्वाचा मुद्दा आहे. यासंदर्भात काँग्रेस पक्ष निवडणूक आयोगाच्या भूमिकेविरोधात लढत असून विधानसभेतील आघाडीच्या १०० पराभूत उमेदवारांनी राज्यातील विविध न्यायालयात याचिका दाखल केल्या आहेत, अशी माहिती काँग्रेसचे नेते आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी शनिवारी येथे दिली.

राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून काँग्रेसच्या वतीने आज राज्यभरात लोकशाहीच्या रक्षणासाठी आंदोलन करण्यात आले. या पार्श्वभूमीवर आज पत्रकार परिषदेत बोलताना चव्हाण यांनी निवडणूक आयोगाच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली. भारतातील लोकशाही प्रगल्भ असून जगाचे आपल्या लोकशाही व्यवस्थेकडे लक्ष असते. अशावेळी निवडणूक आयोग जर निवडणुकीत पक्षपात करत असेल तर तो आपल्या लोकशाहीसाठी चिंताजनक आहे, असे पृथ्वीराज चव्हाण म्हणाले.

राष्ट्रीय मतदार दिनी निवडणूक आयोगाला शुभेच्छा दिल्या पाहिजेत. पण महाराष्ट्रातील जनता त्यांना शुभेच्छा देऊ इच्छित नाही. कारण निवडणूक आयोगाने महाराष्ट्राच्या जनतेची फसवणूक केली आहे, असा आरोपही त्यांनी केला.

दरम्यान, लोकशाही व्यवस्थेत निष्पक्ष आणि पारदर्शक निवडणुका पार पाडण्याची जबाबदारी स्वायत्त संस्था असलेल्या निवडणूक आयोगाकडे आहे. परंतु आयोगाने महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत त्याला हरताळ फासला. विधानसभेला मतदार याद्यांमध्ये मोठा घोटाळा झाल्याने त्याचा फायदा भाापा युतीला झाला आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर सहा महिन्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत ४८ लाख मतदार अधिक वाढले आहेत. विशेष म्हणजे २०१९ लोकसभा निवडणूक ते २०२४ ची लोकसभा निवडणूक या पाच वर्षात ३२ लाख मतदार वाढले. तर मग अवघ्या सहा महिन्यात ४८ लाख मतदार कसे वाढले याचे उत्तर निवडणूक आयोगाने पुराव्यासह द्यावे, अशी मागणी प्रोफेशनल काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रवीण चक्रवर्ती यांनी यावेळी केली.

विधानसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रात एकूण मतदारांची संख्या ९.७०कोटी असल्याचा दावा निवडणूक आयोगाने केला आहे. पण मोदी सरकारच्या आरोग्य मंत्रालयाने जाहीर केलेल्या महाराष्ट्रातील १८ वर्षांवरील प्रौढ लोकसंख्या तर ९.५४ कोटी आहे. या आकडेवारीनुसार १६ लाख मतदारसंख्या वाढली कशी? मतदारयाद्या नोंदणीमध्ये अनेक घोळ करण्यात आले आहेत. शिर्डी मतदारसंघातील लोणी गावात एकाच पत्त्यावर ५ हजार मतदारांची नोंदणी करण्यात आली. याप्रकरणी निवडणूक आयोगाकडे तक्रार करूनही उत्तर मिळाले नाही, याकडे चक्रवर्ती यांनी लक्ष वेधले.

महाराष्ट्रात मतदार याद्यातील भरमसाठ वाढ अनाकलनीय आणि संशयास्पद आहे. यासंदर्भात निवडणूक आयोगाकडे माहिती मागितली असता त्यांनी ती अद्याप दिलेली नाही. निवडणूक आयोगाने महाराष्ट्राच्या जनतेची फसवणूक केली आहे. त्यांनी सर्व माहिती सार्वजनिक करावी, अशी काँग्रेसची मागणी आहे. २५ जानेवारी हा राष्ट्रीय मतदार दिवस आहे. पण निवडणूक आयोगाने या ‘व्होटर डे’ ला ‘चिटर डे’ केले आहे, असा टोलाही चक्रवर्ती यांनी लगावला.

# एसटीच्या भाडेवाढीने चिल्लर पैशांचा भाव वाढला



**मुंबई**

उत्पन्न वाढीसाठी एसटी महामंडळाची शनिवारपासून १४ .९५ टक्के भाडेवाढ झाली आहे; परंतु ही भाडेवाढ सम प्रमाणात झालेली नसून विषम प्रमाणात झाली आहे. त्यामुळे तिकीट दरात एक, दोन रुपयांची वाढ झाली आहे. यामुळे प्रवाशांना सुट्टे एक आणि दोन रुपये घेऊन प्रवास करावा लागत आहे. या सुट्या पैशांवरून वाहक आणि प्रवाशांमध्ये वाद होत आहेत.

नव्या तिकीट दराप्रमाणे फुल तिकीट ११, २१, ३१,४१, ५१,६१, ७१,८१, ९१ रुपयांचे झाले आहे, तर हाफ तिकीट ६, ११, १६, २१, २६, ३१, ३६, ४१, ४६, ५१ आणि ५६ रुपये झाले आहे. पूर्वी तिकीट पाच रुपयांच्या पटीत होते, ते आता एक रुपयांच्या पटीत केले आहे. यामुळे प्रवाशांना तिकीट काढताना अतिरिक्त एक रुपया खिशात ठेवावा लागत आहे. एसटीने दररोज सुमारे ५५ लाख प्रवासी प्रवास करतात. प्रवासादरम्यान प्रवाशांना १०,२०,५० रुपयांसह एक रुपया सुट्टा वाहकांना द्यावा लागत आहे. परंतु प्रत्येक प्रवाशाकडे एक रुपया सुट्टा असतोच असे नाही. अशावेळी प्रवाशांना एका रुपयासाठी उर्वरित पैसे सुट्टे देण्याची वेळ वाहकांवर आली आहे. त्यामुळे सुट्ट्या पैशांवरुन वाहक आणि प्रवाशांमध्ये वारंवार वाद होण्याची भीती आहे.

एसटीने दिवसभरात ५५ लाख प्रवासी प्रवास करतात. त्यात २० लाख महिलांचा समावेश आहे. एसटीचे सर्वाधिक प्रवासी हे ग्रामीण भागातून प्रवास करतात. यातील बहुतेक प्रवाशांकडे स्मार्ट फोन नसतो. त्यामुळे या प्रवाशांचा ऑनलाईन तिकिट काढण्याकडे कल नसतो.

परिवहन मंत्री दिवाकर रावते यांच्या कार्यकाळात सम प्रमाणाच्या पटीत भाडेवाढ झाली होती. रावते हे सामाजिक कार्यकर्ते असल्याने चालक-वाहक व सर्व कर्मचारी यांच्याशी बोलून स्वतः दररोज लक्ष ठेऊन काम करायचे. मात्र नवे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक स्वतः विकासक असल्याने यांना फक्त जागा कशा विकसित करायच्या एवढेच ठाऊक आहे. त्यामुळे जे रावते यांना कळले, ते प्रताप सरनाईक यांना कळले नाही. त्यांनी एसटीला आधी समजून घेण्याची आवश्यकता आहे अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी दिली.

## नागपाडा परिसरातून चार बांगलादेशी महिलांना अटक

**मुंबई**

नागपाड्यातून चार बांगलादेशी महिलांना नागपाडा पोलिसांनी तर बांगलादेशी नागरिकांना बोगस दस्तावेज बनवून देणाऱ्या एका भारतीय एजंटला काळाचौकी युनिटच्या एटीएस अधिकाऱ्यानी अटक केली. अटकेनंतर या पाचही आरोपींना किल्ला न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. अटक आरोर्पीमध्ये आस्मा सुलतान शेख, बारशा नूरमियों खान, पिया दिनेश मंडल, मुसम्मतअली आजीजुल हक्क आणि समीर अहमद शब्बीर अहमद मोमीन यांचा समावेश असल्याचे पोलिसांनी सांगितले.

नागपाडा येथे काही बांगलादेशी नागरिक वास्तव्यास असल्याची माहिती नागपाडा पोलिसांना मिळाली होती. या माहितीनंतर पोलिसांनी या महिलांचा शोध सुरु केला होता. ही शोधमोहीम सुरु असतानाच शुक्रवारी दुपारी साडेबारा वाजता नागपाडा येथील कामाठीपुरा, अकरावी गल्ली, आपोली हॉटेल परिसरातून चार संशयित महिलांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते. चौकशीदरम्यान या चारही महिलांनी त्या बांगलादेशी नागरिक असल्याची कबुली दिली होती. बांगलादेशातील गरीबीसह उपासमारीला कंटाळून त्या बांगलादेशातून भारतात आल्या होत्या. तेव्हापासून नाागपाडा परिसरात राहत असल्याचे तपासात उघडकीस आले. त्यानंतर या चारही महिलांना पोलिसांनी अटक केली. अन्य एका कारवाईत पोलिसांनी समीर मोमीन या आरोपीस एटीएसने अटक केली.

आरोपींकडून पोलिसांनी तीन मोबाईल, चार सिमकार्ड, रोख रक्कम, दोन वॉलेट, दोन चाव्या, २९६ पॅनकार्डसाठी लागणारे अर्ज, लॅपटॉप, हार्डडिस्क, रबरी शिक्के आणि प्रिंटर आदी मुद्देमाल जप्त केला आहे. अटकेनंतर चार महिलांसह पाचही आरोपीना शनिवारी दुपारी किल्ला न्यायालयात हजर करण्यात आले होते. यावेळी न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडी सुनावली आहे.

९ जानेवारीला कॉटनग्रीन येथून तीन बांगलादेशींना पोलिसांनी अटक केली होती. त्यांच्याकडे भारतीय बोगस दस्तावेज सापडले होते. त्यानंतर याच गुन्ह्यात एका महिलेसह तिघांना पोलिसांनी अटक केली होती. त्यांच्या चौकशीतून समीर मोमीन याचे नाव समोर आले होते. त्याचा शोध घेताना त्याला शुक्रवारी जाभंळी नाका परिसरातून पोलिसांनी अटक केली.

## ८.६२ कोटींच्या ड्रग्जसह चार प्रवाशांना अटक

**मुंबई**

आंतरराष्ट्रीय बिमानतळाबर चार प्रवाशांना ८ कोटी ६२ लाखांचे ड्रग्ज, सोने आणि विदेशी चलनासह पोलिसांनी अटक केली. २४ आणि २५ जानेवारी असे दोन दिवस छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमा शुल्क विभागाने विशेष मोहीम हाती घेतली असता हे चौघे सापडले.

एका प्रवाशाच्या शरीरातून पांढऱ्या रंगाच्या चुरा झालेल्या ५५ हून अधिक कॅप्सूल मिळाल्या. या कॅप्सूलमध्ये ड्रग्ज होते. ७ किलो ५१० ग्रॅम वजनाच्या या ड्रग्जची किंमत साडेसात कोटी रुपये इतकी आहे. हा प्रवासी टांझानिया हुन आला होता. दुसऱ्या कारवाईत जेद्दाह येथून मुंबईत आलेल्या दोघा प्रवाशांची बॅग तपासली असता १ किलो १६० ग्रॅम वजनाचे सोने सापडले. ते सोने त्यांनी शरीरातील पोकळीसह शूजमधून लपवले होते. तिसऱ्या कारवाईत दुबईला जाणाऱ्या एका प्रवाशाकडून एक लाख सौदी रियाल म्हणजे २२ लाख ४० लाख रुपयांचे विदेशी चलन जप्त केले.

## महारेराने ग्राहकांसाठी जाहीर केल्या मार्गदर्शक सूचना

**मुंबई**

आयुष्यभराची जमापूंजी खर्च करून घर खरेदी केल्यानंतर त्यात होणारी फसवणूक ग्राहकांसाठी धक्कादायक असते, त्यामुळे घर खरेदी करण्यापूर्वी काही गोष्टींची तपासणी होणे आवश्यक आहे. यासाठी महारे- राने काही मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत, या सूचनांचे पालन केल्यास घर खरेदी व्यवहार सुरक्षित होऊ शकतो. संबंधित गृहनिर्माण प्रकल्प महारे- राकडे नोंदणीकृत असायला हवा, हे तर अत्यावश्यक आहेच. याशिवाय संबंधित प्रकल्पावर न्यायालयात काही खटले प्रलंबित आहेत का, असल्यास कोणते, त्याची सद्यस्थिती काय, एकूण तपशील काय, कुठला 'बोजा' या प्रकल्पाबर आहे का, प्रकल्पाचे प्रारंभ प्रमाणपत्र किती मजल्यांसाठी आहे, संबंधित स्थानिक नियोजन प्राधिकरणाकडून दिल्या जाणाऱ्या प्रकल्प मंजुरीच्या आराखड्यात समग्र प्रकल्पात कशाकशाला मंजुरी दिलेली आहे, या बाबींची घर खरेदीदाराने प्रत्यक्ष व्यवहारापूर्वी खात्री करून घेणे अत्यावश्यक आहे. महारेराने नवीन गृहनिर्माण प्रकल्पाची नोंदणी करताना हा सर्व तपशील, पूरक कागदपत्रांसह देणे बंधनकारक केलेला आहे. संबंधित प्रकल्पाच्या महारेरा नोंदणी क्रमांकाच्या मदतीने महारेराच्या संकेतस्थळावर तो सर्वांसाठी उपलब्ध आहे. याशिवाय घर खरेदीदार आणि प्रवर्तक यांच्यातील घरविक्री करार आणि घर नोंदणी केल्याचे पत्र हे महारेराने प्रामाणिकृत केलेल्या मसुद्यानुसारच द्यावे, असे बंधन प्रवर्तकांबर घातलेले आहे. घर खरेदी करारात दैवी आपत्ती, चटई क्षेत्र, दोष दायित्व कालावधी आणि हस्तांतरण करार या बाबी अपरिवर्तनीय राहतील. त्यात बदल करता येणार नाही. नोंदणीपत्र देताना सदनिका क्रमांक, चटई क्षेत्र, प्रकल्प पूर्णत्वाचा अपेक्षित दिनांक याचा तपशील नोंदवणे यात बंधनकारक करण्यात आले आहे. प्रवर्तकाने घर खरेदी करारात आणि नोंदणीपत्रात स्वतंत्र जोडपत्रात पार्किंग आणि आश्वासित सोयी सुविधांचा समग्र तपशील देणेही बंधनकारक केलेले आहे. यात पार्किंग आच्छादित, खुले, मेकॅनिकल, गॅरेज कसे राहील हे स्पष्ट करणे आवश्यक आहे. शिवाय या पार्किंगची लांबी, रूंदी, उंची, प्रकल्पस्थळी पार्किंगची प्रत्यक्ष जागा हेही या जोडपत्रात नोंदवणे आवश्यक आहे. प्रकल्पात आश्वासित केलेल्या विविध सोयी, सुविधा कधी उपलब्ध होणार, सोसायटीला कधी हस्तांतरीत होणार हेही या जोडपत्रात नमूद करणे गरजेचे आहे. भविष्यात उपस्थित होणाऱ्या शक्यतांबद्दल आधीच काळजी घेऊन महारेराने अनेक बाबी प्रवर्तकांना बंधनकारक केलेल्या आहेत. या सर्व बाबी तपासून घरखरेदी केल्यास व्यवहार सुरक्षित होऊन फसवणूक टाळता येऊ शकते.

## संपादकीय

### ट्रम्प यांचा धक्का

बायडन गेले. कमलाबाई पडल्या आणि ट्रम्प साहेब गादीवर कालच बसले. ट्रम्प यांचे हे दुसरे पर्व आहे. अर्थात हे त्यांचे शेवटचे पर्व आहे ते ट्रम्प यांना ठाऊक आहे. त्यामुळे ट्रम्प यांना प्रत्येक दिवसाच्या चोवीस तासात 48 तासाचे काम करायचे आहे, असे त्यांना वाटते. 'अमेरिका फर्स्ट' या त्यांच्या नाऱ्यामुळे ते आता जगातील अनेक देशांना वाऱ्यावर सोडणार आहेत. त्यातच जगातील लढाया त्यांना थांबवायच्या आहेत, असे त्यांचे म्हणणे आहे. ट्रम्प यांच्या सत्तारोहणानंतर इस्रायल आणि गाझापट्टीत ते काहीही करू शकतील अशी भीती दोघांनाही होती. काही महिन्यापूर्वी गलितगात्र झालेल्या बायडन यांनी युद्ध थांबवण्यासाठी इस्रायल आणि हमास यांच्याकडे एक प्रस्ताव पाठवला होता. दोघांनी तो मान्य केला नाही. याचा ट्रम्प आले आणि हमासला वाटले की ट्रम्प इस्राइयलला प्रचंड मदत करतील आणि आपल्यावर आणखी हल्ले होतील. म्हणून हमासने आपला विरोध मागे घेतला. इकडे इस्रायलला वाटले होते की ट्रम्प आपल्याला आदेश देतील आणि मदत बंद करतील. म्हणून इस्रायलनेही बायडन यांच्या काळातील करार मान्य करून टाकला. या युद्धात इस्रायलचे दोन ते अडीच हजार लोक ठार झाले आणि दोन - अडीचशे ओलीस कैदी हमासच्या ताब्यात आहेत. तिकडे इस्राइलने 60000 पॅलेस्टीनींना मारले आणि इस्राइल पेक्षा दहापट पॅलेस्टिनींना ओलीस ठेवले आहे. आता ट्रम्प यांच्या फक्त नावानेच दोघांनीही घाबरगुंडी उडालेली आहे. त्यामुळे ओलीस कैद्यांना सोडणे आणि गाझा पट्टीतून आपले सैन्य मागे घेणे. हा कार्यक्रम सुरु झालेला आहे. डोनाल्ड ट्रम्प काय करतील याचा भरोसा नसल्याने बहुधा घाईघाईत हा कार्यक्रम पार पडला असावा. आता काही महिन्यांपूर्वीच दोन्ही पक्ष करारासाठी तयार नव्हते. पण आता तात्पुरता का होईना, युद्धबंदीचा करार झालेला आहे. इस्रायलने हमासच्या पहिल्या हल्ल्याला दिलेले उत्तर हमाससाठी प्रचंड भारी पडले. लंब्या-चवड्या बाता करणाऱ्या इराणलाही इस्रायलने चांगलेच ठोकून काढले. हमासला आता आपल्या अस्तित्वासाठी प्रचंड मोठ्या मदतीची गरज आहे. हमासला मदत करायला जगातील अनेक राष्ट्रे तयार आहेत. इस्रायल हमासला पुरता नेस्तनाबूत करण्याच्या इराद्यात होता. पण ट्रम्पशाहीमुळे सध्या तरी दोन्ही बाजू ट्रम्प आता पुढे काय करतात. हे पाहूनच पुढील दिशा ठरवतील. गाझा पट्टीतील जनता पूर्णपणे हमासच्या बाजूने नाही. पॅलेस्टीन मधूनच इस्राइलची निर्मिती झालेली आहे. भारताने पॅलेस्टीनच्या सदैव मदत केली होती. इंदिराजी तर अराफात या पॅलेस्टीन नेत्याला आपला भाऊ मानत असत. अशा परिस्थितीत हे दोन्ही राष्ट्र एकमेकांचे अस्तित्व मान्य करून शांततेने राहतील. असा विश्वास जागतिक पातळीवर संपूर्ण सामाजिक अभ्यास असलेल्या युद्ध निरीक्षकांनाही वाटत नाही. अजूनपर्यंत अपराजित असलेला इस्रायल पुन्हा कधीही डोके वर काढू शकतो. पण गाझा पट्टीतील पॅलेस्टिनींनी डोके वर काढणे त्यांना अजिबात पसंत नाही. तसेही इस्राइल कोणतेही करार पाळत नाही. म्हणूनच हमासनी हल्ला केला होता. त्यानंतर हाहाःकार उडाल्यावरही हमासला मदत करणारे इराण आणि हीजबुल्लाह अगदी युद्ध पातळीवर युद्धोन्मादात होते. महत्त्वाचे म्हणजे, ट्रम्प यांनी असाच शांततावाद आर्थिक बाबीसाठीही स्वीकारला आणि जगातील भारतासह व्यापारी भागीदारांना धमकावण्याचे सत्र सुरू केले नाही. तर ट्रम्प खरोखरच बदललेले आहेत, हे दिसून येईल. पण त्यांनी तर आपला अवाढव्य खर्च कमी करण्यासाठी दोन अत्यंत हुशार उद्योजक श्रीमंतांनाच कामगिरी सोपवलेली आहे. अशा स्थितीत इस्रायल आणि हमास यांच्यामधील संघर्षाला पुन्हा कधी विस्फोटक वळण लागेल, हे सांगता येणार नाही. ट्रम्प यांचे ट्रम्पकार्ड शांततेसाठी चालले. तर जगाला चांगल्या दिशेने नेण्याचे पुण्यकार्य त्यांनी केले, असे इतिहासात नमूद होईल. एकूणच ट्रम्प काय करतील. हे फक्त ट्रम्प यांनाच ठाऊक आहे. तेव्हा त्याबद्दल अधिक न लिहिलेले बरेऽऽ !

### लालूमित्र नितीश

नागालँड मधील जदयुच्या आमदाराने सरकारचा पाठिंबा काढल्यामुळे केवळ राज्यातच नाही. तर दिल्ली आणि बिहार या ठिकाणीही चांगलीच चर्चा रंगली आहे. नितीश कुमार यांनी आपला रंग दाखवला. अशी चर्चा होत असतानाच त्या राज्याच्या जदयु प्रमुखांनी नीतीश कुमार यांच्याकडून पाठिंबा का काढला गेला? म्हणून जाब विचारण्यात आला आहे, अशी सुद्धा बातमी आहे. बिहारचे हे राजकारण इतरांच्या आकलनशक्ती पलीकडचे असते. अजून एक बातमी अशी आहे की, काल एका गुप्त ठिकाणी लालूप्रसाद यादव आपले जुने समाविचारी स्नेही नितीश कुमार यांना रात्रीच्या अंधकारात एका खोलीत भेटल्याचे वृत्त आहे. त्यांनी म्हणजे त्या दोघांनी तेथे तीन तास 'गुफ्तगु' केल्याची वार्ता आहे. कधीकाळी हे दोन्ही समाजवादी नेते एकाच धारेत होते. पण समाजवाद्यांचा इतिहास पाहिला. तर ते अनेक वेळा विभक्त होतात असे दिसते. त्याचप्रमाणे सध्या तरी लालूप्रसाद आणि नितीश कुमार एक दुसऱ्याच्या विरुद्ध शड्डू ठोकून उभे आहेत. कोणे एके काळी बिहारमध्ये समाजवाद्यांची चलती होती. केवळ बिहारचेच नाही. तर इतर अनेक राज्यांचे त्यांचे नेते बिहार मधून निवडून येत असत. मध्य प्रदेशात वर्षानुवर्ष खासदार राहिलेल्या जबलपूरच्या शेठ गोविंददास यांच्या कन्येला पराभूत करून एक यादव नामक उमेदवार तेव्हा निवडून आले होते. त्यानंतर त्यांची कर्मभूमी बिहार बनली होती. आपल्या मुंबईतील मोठे कामगार नेते जॉर्ज फर्नांडिस यांचे राजकारणही बिहार राज्यातच फुलले. निष्णात आणि विख्यात संसदपटू मधु लिमये मुंघेर मधून अनेकदा खासदार म्हणून निवडून आले होते. पण या आणि अशा सर्व समाजवादी नेत्यांमधील वादावादी चांगलीच चर्चेत राहत होती. हे सर्व समाजवादी नेते अत्यंत बुद्धिमान आणि समाजासाठी काहीतरी करण्याची तळमळ असलेले, प्रचलित सरकार बरोबर दोन हात करण्यासाठी सक्षम असलेले असे त्या वेळचे नेते होते. आता सर्व बदललेले आहे. तर अशा प्रकारे सर्व बदललेल्या परिस्थितीमध्ये लालूप्रसाद यादव आणि त्यांचे कुटुंब सध्या सत्तेबाहेर आहे. तर तिकडे नितीश कुमार कधी यांच्या तर कधी त्यांच्या, पाठिंब्यामुळे मुख्यमंत्री पदावर अनेक वर्ष विराजमान आहेत. आता केंद्रात मोदीजींजवळ ३०३ खासदार नाहीत. जादूई आकडा म्हणजेच २७२ ही खासदार नाहीत. पण तरीही मोदीजी आपल्या चाणक्याच्या सहाय्याने आपले सरकार चालवीत आहेत. पाच - २५ खासदार इकडून तिकडे आले तर सत्तापालट होऊ शकते. पण अटल बिहारी वाजपेयी यांच्यासारखे पंतप्रधान असले तरच तसा प्रयोग करण्यात येऊ शकतो. सध्याचे केंद्रातील सरकार कितीही खासदार कमी पडले, तरी सरकार पडणार नाही. याची खात्री कुणीही देऊ शकेल. आम्हीही देत आहोत. आजच्या एकूण राजकीय परिस्थितीचा विचार केला. तर तथाकथित इंडिया आघाडीचे खासदार आणि भाजपचे खासदार जवळ जवळ सारखेच आहेत. एनडीए जवळ मोदी आणि शहा आहेत. भाजप सारखा मोठा पक्ष आहे आणि लक्ष-लक्षच नव्हे तर कोटी-कोटी तयार आहेत. त्यामुळे सध्याचे केंद्राचे सरकार धोक्यात येऊ शकत नाही, ही आमची शंभर टक्के सत्य धारणा आहे. प्रश्न असा आहे की, मग हे दोन मित्र रात्रीच्या अंधारात कशाला भेटले असतील. त्यांनी राजकारणाशिवाय इतर कशाची चर्चा केली असेल. देशासाठी काय काय करता येईल, हे नितीश कुमार यांना पक्के ठाऊक आहे. त्यांनी विरोधकांच्या राज्यात जाऊन इंडियाचे नामकरण होण्यापूर्वी अनेक प्रभावी नेत्यांना संघटित केले होते. जर त्यांना सर्वसंमतीने इंडियाचे संयोजक बनविले असते. तर आज तो पक्ष सत्तारूढ झाला असता. यातही वाद नाही. आताच्या घडीला लालू यांच्याबरोबर नितीश कुमार यांचे काय चालू आहे. याचा अंदाज भल्याभल्यांना लागलेला नाही, लागणार नाही. कारण नितीश कुमार यांच्याबरोबर जोपर्यंत चंद्राबाबू नायडू तसेच आणखी काही पक्ष सोबत येत नाहीत, तोपर्यंत मोदीजींना धोका नाही. यापुढे लालू आणि नितीश कुमार यांची जोडी पुन्हा उद्या काही चमत्कार घडवणार आहे काय, याची आपल्या देशाला प्रतीक्षा आहे.

# कलम 370 आणि काश्मीर: शांततेच्या मार्गावर नवे पाऊल

१६ ऑक्टोबर २०२४ रोजी, ओमर अब्दुल्ला यांनी केंद्रशासित प्रदेश जम्मू आणि काश्मीर (जम्मू आणि काश्मीर) चे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. सप्टेंबर-ऑक्टोबर २०२४ मध्ये तीन टप्प्यांत झालेल्या विधानसभा निवडणुकीत राजकीय पक्षांच्या क्षेत्रनिहाय कामगिरीत लक्षणीय तफावत दिसून आली. नॅशनल कॉन्फरन्स (एनसी) आणि भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस (आयएनसी) यांच्या संयुक्त आघाडीने काश्मीर प्रांतातील ४७ पैकी ४० जागा जिंकल्या आणि ४१.०८ टक्के मते मिळवली. याउलट जम्मूत भारतीय जनता पक्षाने ४५.२३ टक्के मतांसह २९ जागांवर विजय मिळवला.

भाजपाने संसदेत कोणत्याही चर्चेशिवाय एकतर्फीपणे मंजूर केलेला विशेष दर्जा काढून घेतल्याबद्दल या ठरावात चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

बहुधार्मिक आणि बहुजातीय केंद्रशासित प्रदेशात घडत असलेल्या या स्पष्ट विभाजनाच्या पार्श्वभूमीवर, निवडणुकीदरम्यान राजकीय चर्चा नवी दिल्लीने कलम ३७० शिथिल करण्यावर केंद्रित झाली आणि हे दर्शविते की काश्मिरी समाजाच्या मानसिकतेत अजूनही फुटीरतावादाची बीजे खोलवर रुजलेली आहेत. विधानसभा अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यानंतर ४ नोव्हेंबर रोजी पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टीने (पीडीपी) कलम ३७० रद्द करण्यास तसेच जम्मू आणि काश्मीरच्या पूर्वीच्या राज्याचा विशेष दर्जा रद्द करण्यास विरोध करणारा ठराव मांडला. त्यानंतर दोन दिवसांनी, नॅशनल कॉन्फरन्सच्या उपमुख्यमंत्र्यांनी ५ ऑगस्ट २०१९ रोजी नवी दिल्लीने रद्द केलेला काश्मीरचा विशेष दर्जा पुन्हा बहाल करण्याचा ठराव मांडला. भाजपाने संसदेत कोणत्याही चर्चेशिवाय एकतर्फीपणे मंजूर केलेला विशेष दर्जा काढून घेतल्याबद्दल या ठरावात गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली.

कलम ३७० आणि फुटीरतावाद

१९४९ मध्ये भारतीय राज्यघटनेत समाविष्ट करण्यात आलेले कलम ३७० हे कालांतराने केंद्र आणि प्रादेशिक नेत्यांच्या राजकीय शोषणाचे हत्यार बनले. या कलमाने मिळालेल्या स्वायत्ततेचा प्रादेशिक नेत्यांनी आपल्या स्वार्थासाठी कुशासन, भ्रष्टाचार आणि हुकूमशाही राजवटीसाठी गैरवापर केला. दुसरीकडे, केंद्र सरकारने अनेकदा या गैरप्रकारांकडे डोळेझाक केली. परिणामी, या परिस्थितीने पाकिस्तानपुरस्कृत दहशतवादाला बळ दिले आणि काश्मीर खोऱ्यात वर्षानुवर्षे अशांततेची आग धगधगत राहिली. सर्वसामान्य काश्मिरी जनतेला मूलभूत अधिकार नाकारणाऱ्या १९७८च्या सार्वजनिक सुरक्षा कायद्याने राज्यातील हुकूमशाही व्यवस्थेला आणखी मजबूती दिली. या कठोर कायद्यांमुळे कुशासन आणि भ्रष्टाचाराचा विळखा अधिकच घट्ट झाला, ज्यामुळे काश्मीरमधील सामाजिक-आर्थिक विकास पूर्णपणे ठप्प झाला.

सत्ताधारी वर्गाने आपल्या वैयक्तिक फायद्यासाठी केंद्र सरकारकडून आलेला निधी बिनधास्त हडप केला. राज्याच्या निधीत उघडपणे गैरवापर, पक्षपाती निर्णय आणि घराणेशाहीची खोचक संस्कृती यामुळे, २००५ पर्यंत जम्मू-काश्मीर भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक भ्रष्ट राज्य बनले. २०१२ ते २०१६ या कालावधीत झालेला बनावट शस्त्र परवाना घोटाळा, ज्याने भारतातील सहा अन्य राज्यांनाही प्रभावित




केले, हा राष्ट्रीय सुरक्षेसाठी मोठा धोका ठरला. या घोटाळ्याने पोलिस, नोकरशाही आणि गुन्हेगारी प्रवृत्ती यांच्यातील अस्वस्थ करणारे आणि खोलवर पोहोचलेले संबंध उघडकीस आणले. गैरव्यवस्थापन, हुकूमशाही वृत्ती आणि व्यापक भ्रष्टाचाराने सर्वसामान्य काश्मिरींचा लोकशाहीवरील विश्वास पार उडून गेला. त्यातच, प्रादेशिक राजकीय पक्षांनी कलम ३७० चा वापर जनतेच्या भावना भडकवण्यासाठी केला, आणि नवी दिल्लीविरोधात लोकांचे मन वळवले. या सगळ्यामुळे काश्मीर खोऱ्यात लोकशाही मूल्यांचा ऱ्हास झाला आणि फुटीरतावादाचे वादळ अधिकच उफाळून आले.

१९४७ मध्ये नव्याने स्थापन झालेल्या पाकिस्तानच्या आक्रमणानंतर, जम्मू-काश्मीरचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण सुलभ करण्यासाठी आणि संविधान सभेची स्थापना करण्याच्या उद्देशाने कलम ३७० ही एक तात्पुरती तरतूद असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

ऑगस्ट २०१९ मध्ये, नवी दिल्लीने जम्मू-काश्मीरच्या स्थैर्य, सामाजिक-आर्थिक प्रगती आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या आकांक्षांना पूर्तता करण्यासाठी राज्याच्या संस्थात्मक आणि घटनात्मक व्यवस्थेत एतिहासिक बदल करण्याचा निर्णय घेतला. सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयाला मान्यता देत, कलम ३७० रद्द करण्याचा निर्णय योग्य ठरवला आणि जम्मू-काश्मीरला लवकरात लवकर राज्याचा दर्जा बहाल करण्याचे निर्देश दिले. तसेच, १९४७ मध्ये पाकिस्तानच्या आक्रमणानंतर संविधान सभेची स्थापना आणि जम्मू-काश्मीरचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण सुलभ करण्यासाठी कलम ३७० ही केवळ तात्पुरती तरतूद होती, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

या पार्श्वभूमीवर, जम्मू-काश्मीर विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनात पीडीपी आणि सत्ताधारी नॅशनल कॉन्फरन्सने मांडलेल्या ठरावांमधून शाश्वत प्रादेशिक शांतता आणि स्थैर्याबद्दलची चिंता व्यक्त होते. मात्र, या कृतींमुळे प्रादेशिक राजकीय पक्षांचा संकुचित राजकीय दृष्टिकोन आणि त्यांच्या किरकोळ फायद्यांसाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा जाणीवपूर्वक अवमान करण्याची प्रवृत्ती अधोरेखित होते. त्यामुळे अशा वर्तनाने प्रादेशिक राजकारणात स्थैर्य आणि जबाबदारीची उणीव प्रकर्षाने जाणवते.

लोकांच्या आकांक्षांचे प्रतिनिधित्व करणे

विधानसभा निवडणुकीनंतर लगेचच पाकिस्तान आणि त्याच्या दहशतवादी यंत्रणांनी काश्मीर खोऱ्यात अशांतता पसरवण्यासाठी हल्ल्यांची मालिका सुरू केली. २० ऑक्टोबर रोजी गांदरबल जिल्ह्यात पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटना रेझिस्टन्स फ्रंट (टीआरएफ) च्या भ्याड हल्ल्यात सात निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला, तर पाच जण गंभीर जखमी झाले. २ नोव्हेंबर रोजी श्रीनगरच्या मध्यवर्ती भागात सुरक्षा यंत्रणांनी एका परदेशी दहशतवाद्याला ठार केले. मात्र, ३ नोव्हेंबरला श्रीनगरमध्ये झालेल्या ग्रेनेड हल्ल्यामुळे परिस्थिती अधिक चिघळली; या हल्ल्यात एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर दहा जण जखमी झाले. दहशतवादाने सामान्य काश्मिरी नागरिकांच्या जीवनात भीतीचे सावट निर्माण केले आहे. विशेषतः तरुण पिढी दहशतवादामुळे वैतागली असून, त्यांनी पाकिस्तान आणि त्याच्या दहशतवादी संघटनांविरोधात निदर्शने करत आपला रोष व्यक्त केला. अशा घटनांनी दहशतवादाच्या विरोधात सामान्य लोकांची भावना अधिक तीव्र झाली असून, त्यांच्या शांततेच्या आकांक्षांचे प्रतिबिंब ठळकपणे दिसत आहे. बहुतेक सुशिक्षित तरुणांना जम्मू-काश्मीरमध्ये शांतता प्रस्थापित करून सामान्य जीवनाचा अनुभव घ्यायचा आहे, आणि हाच मार्ग केंद्रशासित प्रदेश २०१९ पासून हळूहळू स्वीकारत आहे. पाकिस्तानच्या छद्म युद्धाच्या पार्श्वभूमीवर, प्रादेशिक राजकीय पक्षांनी फुटीरतावाद आणि केंद्रकेंद्री प्रवृत्तीला चालना देण्याएवजी, कलम ३७० सारख्या एतिहासिक चुका स्वीकारण्यापेक्षा दहशतवाद आणि हिंसाचाराच्या कठोर निषेधासाठी ठराव संमत करावा. नॅशनल कॉन्फरन्सच्या नेतृत्वाखालील सरकारने राजकीय नौटंकी आणि खोट्या वक्तृत्वाला महत्त्व न देता, जम्मू-काश्मीरच्या तरुणांच्या शांततेच्या आणि समृद्धीच्या आकांक्षांना पूर्णपणे पाठिंबा द्यावा. या तरुण पिढीची आकांक्षा शाश्वत शांततेची आणि प्रगतीची आहे, आणि त्यांच्या स्वप्नांना आकार देण्यासाठी राजकीय नेत्यांनी त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. यामुळे केवळ जम्मू-काश्मीरचं भविष्यच नव्हे, तर भारताच्या एकात्मतेचा पाया अधिक मजबुतीने रचला जाईल.

प्रादेशिक पक्षांनी तरुणांमध्ये वाढत असलेल्या व्यसनाधीनतेला आळा घालण्यास प्राधान्य दिले पाहिजे.

वृत्तानुसार, केंद्रशासित प्रदेशात ९००,००० पेक्षा जास्त लोक अंमली पदार्थांच्या व्यसनाधीनतेला बळी पडले आहेत. धार्मिक नेत्यांनी देखील या वाढत्या अंमली पदार्थांच्या सेवनाच्या प्रकरणांबाबत निषेध व्यक्त करणे सुरू केले आहे, ज्यामुळे त्वरित कारवाईची आवश्यकता अधिक तीव्रतेने व्यक्त होत आहे. प्रादेशिक पक्षांनी या गंभीर समस्येवर त्वरित लक्ष देऊन, तरुणांमध्ये वाढत असलेल्या व्यसनाधीनतेला आळा घालण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात. सीमेपलीकडून आयात केलेल्या अमली पदार्थांमुळे जम्मू-काश्मीरचा सामाजिक गाभा कोलमडून टाकण्याचा पाकिस्तानचा स्पष्ट हेतू समोर आलेला आहे. यामुळे दहशतवाद आणि बंडखोरीला छुपा पाठिंबा दिला जात आहे. त्यामुळे या भागातील तरुणांच्या भवितव्याची सुरक्षा करण्यासाठी आणि सामाजिक विघटन रोखण्यासाठी त्वरित आणि कठोर पावले उचलण्याची गरज आहे. प्रादेशिक पक्षांनी या समस्येचे गांभीर्य ओळखून, या संकटाचा सामना करण्यासाठी एकजुटीने आणि प्रभावी धोरण आखावे.

प्रादेशिक राजकीय पक्षांनी एतिहासिक तक्रारी आणि पाकिस्तानच्या नापाक इराद्यांना मदत करणाऱ्या फुटीरतावादी राजकारणाच्या तावडीतून दूर राहणे अत्यंत आवश्यक आहे. त्याएवजी, त्यांनी जम्मू-काश्मीरच्या जनतेच्या, विशेषत: तरुणांच्या खऱ्या आकांक्षांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. या तरुणांना उज्ज्वल भविष्य मिळवण्याची पूर्ण अपेक्षा आहे. २०१९ नंतर लागू झालेल्या आरक्षण धोरणाच्या परिणामी, समाजातील दुर्बल घटकांसाठी ६० टक्क्यांहून अधिक नोकऱ्या राखीव ठेवल्या गेल्या आहेत, परंतु खुल्या गुणवत्ता प्रवर्गातील हजारो बेरोजगार तरुणांनी यावर तीव्र टीका केली आहे.

प्रादेशिक राजकीय पक्षांनी जम्मू-काश्मीरमधील लोकांच्या गरजा आणि आकांक्षांवर अधिक लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. सामाजिक सलोखा आणि सर्वसमावेशकता वाढवून एकात्मतेचे ध्येय स्वीकारले पाहिजे. यामुळे या क्षेत्रासाठी शांतता, समृद्धी आणि सर्वसमावेशक विकासाची दिशा ठरेल. यासाठीच जर राजकीय पक्षांनी योग्य पावले उचलली नाहीत, तर जम्मू-काश्मीर पुन्हा अशांतता आणि दहशतीच्या गर्तेत सापडू शकतो.

# जागतिक आरोग्य संघटनेला धोक्याची घंटा

अमेरिकेचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प व्हाईट हाऊसमध्ये परतल्यानंतर अमेरिका जागतिक आरोग्य संघटनेतून (WHO) औपचारिकपणे बाहेर पडू शकते अशी शक्यता वर्तवली जात आहे. जागतिक आरोग्य व्यवस्थेवर याचा विपरीत परिणाम होईल. जागतिक आरोग्य नेते म्हणून अमेरिकेच्या भूमिकेवर पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नसले तरी, अमेरिकेच्या या निर्णयाचा अर्थ काय, जागतिक आरोग्याच्या गरजा काय आहेत आणि बदललेल्या परिस्थितीवर मात करण्यासाठी कोणती पावले उचलणे आवश्यक आहे याची जागतिक समुदायाने दखल घेतली पाहिजे.

भीती का व्यक्त केली जात आहे?

2020 मध्ये, ट्रम्प यांनी जागतिक आरोग्य संघटनेतून माघार घेण्यासाठी पावले उचलली होती त्यांचे म्हणणे होते की कोविड-19 चा सामना करण्यात अपयशी ठरल्याबद्दल चीनला जबाबदार न धरता संस्थेने आपला पक्षपातीपणा दर्शविला आहे. कोविड-19 ला वेळेवर आंतरराष्ट्रीय चिंतेची सार्वजनिक आरोग्य आणीबाणी (PHEIC) घोषित न केल्याबद्दल जागतिक समुदायाने जागतिक आरोग्य व्यवस्थेवर टीका केली होती. 2013 मध्ये MERC-COV च्या उद्रेकादरम्यान आणि 2014 मध्ये इबोला दरम्यानच्या विलंबित घोषणेदरम्यान जागतिक आरोग्य व्यवस्था त्याच्या सुस्तपणासाठी आधीच तपासणीखाली असताना हे घडले. कोविड-19 दरम्यान, जागतिक आरोग्य संघटनेवर चीनचा प्रभाव या वस्तुस्थितीवरून समजला होता, की ही संस्था बीजिंगकडून डेटा मिळविण्यात अयशस्वी ठरली आणि एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीमध्ये कोरोना संसर्गाच्या प्रसाराबद्दल त्वरित चेतावणी जाहीर करू शकली नाही. "गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये, जागतिक आरोग्य संघटनेच्या प्रवक्त्या मारिया व्हॅन केरखोव्ह यांनी चीनला" "नैतिक आणि वैज्ञानिक अनिवार्यता" "यावर जोर देत साथीच्या रोगाचे नमुने देण्याचे आवाहन केले होते, परंतु त्यावेळी चीन ठाम होते की त्यांनी संस्थेला सर्व नमुने प्रदान केले आहेत".

2020 मध्ये, ट्रम्प यांनी जागतिक आरोग्य संघटनेतून माघार घेण्यासाठी पावले उचलली होती त्यांचे म्हणणे होते की कोविड-19 चा सामना करण्यात अपयशी ठरल्याबद्दल चीनला जबाबदार न धरता संस्थेने आपला पक्षपातीपणा दर्शविला आहे.

जागतिक आरोग्य संघटनेतून अमेरिकेच्या बाहेर पडण्याच्या चर्चेला वेग येत आहे कारण कोविड-19 च्या जन्माचे राजकारण अविरतपणे सुरू आहे. "कोरोनाव्हायरस साथीच्या रोगावरील रिपब्लिकन नेतृत्वाखालील निवड समितीने असा निष्कर्ष काढला आहे की" "चीनमधील वुहान येथील प्रयोगशाळा कोविड-19 विषाणूचे सर्वात संभाव्य मूळ असल्याचे दिसते". "उपसमितीनुसार, प्रयोगशाळेत 'गेन-ऑफ-फंक्शन रिसर्च' (वैद्यकीय-संशोधन कार्य ज्यामध्ये जनुक उत्पादनांची जैविक कार्ये वाढविण्यासाठी एखाद्या जीवामध्ये अनुवांशिकदृष्ट्या बदल केला जातो) होत होता आणि तेथे जैवसुरक्षेबाबत पुरेशी व्यवस्था केली गेली नव्हती. त्यामुळे कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढल्याची शक्यता आहे. यू. एस. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ (NIH) च्या संभाव्य धोकादायक संशोधनावर देखरेख ठेवण्यात जागतिक आरोग्य संघटनेचे अपयश आणि वुहान इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरोलॉजी (WIV) मधील गळती लपवण्यासाठी चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या (CCP) राजकीय दबावासमोर झुकणे हे महामारीचे कारण असल्याचे उपसमितीने मानले.

**उत्पत्तीचा प्रश्न अजूनही अनुत्तरित**

काँग्रेसमधील डेमोक्रॅट्सनी उपसमितीचा अहवाल स्वीकारण्यास नकार दिला आहे. त्यांच्या मते, ही महामारीबद्दलची अतिरेकी वृत्ती आहे आणि कोविड-19 च्या उत्पत्तीच्या वास्तविक कारणाबद्दल स्पष्टता नाही. वुहानच्या मांस बाजारात विकले जाणारे मांस सार्स-कोव्ह-2 (कोरोनाव्हायरस) ने संक्रमित होते आणि अशा प्रकारे हा विषाणू मानवांमध्ये आला हे निश्चित करणे शक्य झाले नाही. विशेष म्हणजे, अमेरिकेच्या ऊर्जा विभागाने ते काही प्रयोगशाळेतून पसरल्याचे "अर्धे दावे" करून नोंदवले. हे त्याच्या पूर्वीच्या तटस्थ भूमिकेपेक्षा वेगळे आहे. राष्ट्रीय गुप्तचर परिषदेचा ठाम विश्वास आहे की विषाणू कधीकधी, परंतु क्वचितच, एका प्रजातीतून दुसऱ्या प्रजातीत संक्रमित होतो, तर फेडरल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन (FBI) म्हणते की प्रयोगशाळेतील अपघात हे कारण असू शकते. कोविड-19 च्या सुरुवातीच्या काळातील सततच्या राजकारणाबाबत आणि त्याचा एका जीवातून मानवामध्ये प्रसार होणे किंवा प्रयोगशाळेतून गळती होणे याबाबतच्या वैज्ञानिक पुराव्यांसह परिस्थिती स्पष्ट होईपर्यंत विषाणूच्या उत्पत्तीचे रहस्य स्पष्ट होणार नाही, हे स्पष्ट आहे.

**जागतिक आरोग्य विरुद्ध राष्ट्रीय हित**

ट्रम्प प्रशासन जागतिक आरोग्य संघटनेच्या प्रयत्नांमध्ये अमेरिकेच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणार आहे यात काही आश्चर्य नाही. संसर्गजन्य रोगांचा सामना करण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी पुरवून, अमेरिकेने जागतिक आरोग्य नेतृत्वावर वर्चस्व गाजवले आहे, विशेषतः विकसित जगाची सुरक्षा आणि ग्लोबल साउथला आर्थिक फायदा मिळवून देणे. एवढे सगळे करूनही कोविड-19 साठी अमेरिका तयार नव्हती. थोडक्यात, जागतिक आरोग्यावर भर देणारे अमेरिकेचे परराष्ट्र धोरण कोविड-19 पासून आपल्या राष्ट्रीय हितसंबंधांचे रक्षण करण्यात अयशस्वी ठरले. यामुळे अमेरिकेत महामंदीनंतरची सर्वात मोठी आर्थिक मंदी आली आणि कोरोनामुळे 12 लाख अमेरिकन लोकांनी आपला जीव गमावला.

जागतिक आरोग्य संघटनेतून बाहेर पडण्याच्या ट्रम्प यांच्या 2020 च्या निर्णयाला उलटवून बायडेन प्रशासनाने जागतिक आरोग्यामध्ये अमेरिकेचे नेतृत्व पुनर्संचयित करण्याचा प्रयत्न केला. तथापि, देशांतर्गत राजकारण आणि भू-राजकारणातील ध्रुवीकरणामुळे जागतिक आरोग्यामध्ये अमेरिकेच्या सहभागाचे कारण काय असा प्रश्न निर्माण झाला आहे. उदाहरणार्थ, बायडेन यांनी 'TRUMP-1.0', 'ऑपरेशन वार्प स्पीड' (OWS) चा वारसा चालू ठेवला ज्यामध्ये कोविड-19 लसी विक्रमी वेळेत तयार केल्या गेल्या. परंतु लस राष्ट्रवाद आणि कोव्हॅक्स (कोविड-19 लसींची जागतिक उपलब्धता सुनिश्चित करण्याचा उपक्रम) मुळे उद्भवलेल्या असमानतेमुळे या प्रयत्नांमध्ये अडथळा येत असताना, रशिया आणि चीनच्या लस कुटनीतीमुळे जागतिक आरोग्य परिदृश्य बदलले. परिणामी, जागतिक आरोग्य हे अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाचे प्रमुख केंद्रबिंदू राहिले नाही.

जागतिक आरोग्यावर भर देणारे अमेरिकेचे परराष्ट्र धोरण कोविड-19 पासून आपल्या राष्ट्रीय हितसंबंधांचे रक्षण करण्यात अयशस्वी ठरले. यामुळे अमेरिकेत महामंदीनंतरची सर्वात मोठी आर्थिक मंदी आली आणि कोरोनामुळे 12 लाख अमेरिकन लोकांनी आपला जीव गमावला.

**संभाव्य उलथापालथ**

जरी जग राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या अनपेक्षित निर्णयांसाठी सज्ज असले तरी, अमेरिकेने जागतिक आरोग्य संघटनेतून बाहेर पडण्याच्या परिणामांचे आपण मूल्यांकन करणे महत्वाचे आहे. अमेरिकेच्या अशा कोणत्याही निर्णयामुळे धक्का बसेल कारण ते जागतिक आरोग्य संघटनेला सर्वात मोठ्या देणगीदारांपैकी एक आहे. 2022-23 मध्ये त्यांनी 1.28 अब्ज डॉलर्सची मदत दिली. अर्थात, त्याच्या बाहेर पडण्यामुळे जागतिक पाळत ठेवणे आणि आरोग्याच्या जोखमींशी संबंधित प्रयत्नांवर परिणाम होऊ शकतो. यामुळे जागतिक आरोग्य संघटना आणि संशोधन व विकासासाठीच्या विविध अमेरिकन संस्थांमधील सहकार्यातही अडथळा येऊ शकतो. संस्थेला अनुभवी तांत्रिक आणि प्रशासकीय मनुष्यबळाची हानी होऊ शकते. HIV/AIDS, मलेरिया आणि TB आणि इतर कार्यक्रमांना समर्पित असलेल्या U.S. एजन्सी फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंटच्या (USAID) नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थच्या फोगार्टी इंटरनॅशनल सेंटरसाठी निधी देखील कमी केला जाईल. पुनरुत्पादक आरोग्यावर काम करणारा संयुक्त राष्ट्र लोकसंख्या निधी आणि HIV प्रतिबंधासाठी समर्पित एड्स रिलीफसाठी राष्ट्रपतींच्या आपत्कालीन योजनेवर (PEPFAR) देखील परिणाम होण्याची अपेक्षा आहे. परदेशी बिगर-सरकारी संस्थांना गर्भपातासाठी कायदेशीर सहाय्य पुरविण्यापासून रोखण्यासाठी 'ग्लोबल गॅग नियम' किंवा निधीवर स्थगिती लागू केली जाऊ शकते. त्याचप्रमाणे, कर्करोगावर उपचार करण्यासाठी मदत करणारा 'कॅन्सर मूनशॉट' उपक्रम, ज्याला अलीकडेच नवीन जीवन देण्यात आले आहे, तो रद्द केला जाऊ शकतो.

ट्रम्प प्रशासनाचे संशयी नेते आरोग्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या सरकारसाठी तयार आहेत, परंतु युनायटेड स्टेट्स आपल्या परराष्ट्र धोरणात जागतिक आरोग्याला नवीन स्वरूपात समाविष्ट करू शकते अशी चिन्हे देखील आहेत. हे लक्षात घेण्यासारखे आहे की ऑपरेशन वार्प स्पीड हे दर्शविते की अमेरिकन जैवतंत्रज्ञान आणि औषधनिर्माण उद्योग नवीन धोक्याचा सामना करण्यासाठी तात्काळ तांत्रिक उपायांचा अवलंब करून उत्पादन करण्यास सक्षम होते. महामारी आणि हवामान बदलाशी संबंधित आरोग्याच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी बौद्धिक संपदा अधिकार आणि भू-राजकीय स्पर्धा यासारख्या प्रोत्साहनांद्वारे देखील नवकल्पनांचा पाठपुरावा केला जाऊ शकतो. देशांतर्गत औषधांच्या किंमती कमी करणे, अमेरिकेच्या अन्न आणि औषध प्रशासनाच्या तरतुदींशी जगाशी सुसंवाद साधणे आणि लस अधिक सुरक्षित करणे यासारख्या पावलांचाही या अजेंड्यात समावेश आहे. बायडेन यांचा जैवसुरक्षा आणि जैवसुरक्षेचा अजेंडा देखील समाविष्ट केला जाऊ शकतो. जैवसुरक्षेच्या तरतुदींचा विस्तार करण्यासाठी NIH मध्ये संरचनात्मक सुधारणा हाती घेण्यात आल्याचे वृत्त आहे, ज्यांचे इकोहेल्थ अलायन्स आणि वुहान इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरोलॉजी यांच्याशी असलेले संबंध या साथीच्या आजारातील कथित भूमिकेसाठी छाननीखाली आले.

**प्रतिसाद कसा असेल?**

अमेरिका आपल्या परराष्ट्र धोरणात जागतिक आरोग्याला पुन्हा आकार देण्याचा निर्धार करत असताना, 'ग्लोबल साउथ' ने पुढे येण्याची गरज आहे. सुरक्षेच्या दृष्टीकोनातून, कोणताही देश आरोग्याकडे दुर्लक्ष करू शकत नाही, त्यामुळे अमेरिका जागतिक आरोग्य संघटनेतून बाहेर पडण्याची शक्यता नाही, परंतु होय, ते त्याचे योगदान कमी करू शकते. अमेरिकेच्या या कपातीची भरपाई चीनद्वारे केली जाऊ शकते, ज्याने आपल्या हेल्थ सिल्क रोडच्या माध्यमातून आरोग्यसेवेचे चित्र बदलण्यास सुरुवात केली आहे. आणखी एक दावेदार युरोप असू शकतो, परंतु ब्रिटनने आपला परदेशी विकास सहाय्य कार्यक्रम 2023 मध्ये 2020 मध्ये 16.7 टक्क्यांवरून 2023 मध्ये 7.6 टक्क्यांपर्यंत कमी केला, जे दर्शविते की युरोपचा दावा युरोपियन युनियनवर अवलंबून असेल. रशिया-युक्रेन आणि पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या संघर्षांमुळे (जरी आता हमास आणि इस्रायलमध्ये युद्धविराम आहे) जागतिक आरोग्य संसाधनांमध्ये मोठ्या प्रमाणात कपात केली जात आहे, जे सूचित करते की BMFG सारख्या 'परोपकारी' संस्था ही कमतरता भरून काढू शकतात, परंतु या कपातीची भरपाई कशी केली जाईल हे अद्याप निश्चितपणे सांगणे शक्य नाही.

सत्तेचे हे हस्तांतरण, ज्यामध्ये 'ग्लोबल नॉर्थ' म्हणजे ग्लोबल नॉर्थमधील पारंपारिक देशांचे जागतिक आरोग्याकडे कमी लक्ष देण्याचे उद्दिष्ट आहे, ही ग्लोबल साउथसाठी त्याच्या गंभीर आरोग्य गरजा पूर्ण करण्याची संधी असू शकते. संस्थेमध्ये पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवण्यासाठी आणि साथीच्या आजाराशी संबंधित सर्व वादग्रस्त समस्यांचे निराकरण करण्यासाठी आवश्यक सुधारणा हाती घेण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेला पटवून देण्याची सध्याची चर्चा ही ग्लोबल साउथसाठी एक संधी आहे. PABS ही अनुवांशिक संसाधनांची देवाणघेवाण सुनिश्चित करण्याची यंत्रणा, ती दावा करते तशी समानता आणि निष्पक्षता आणू शकत नाही. त्यामुळे निवड करण्याची गरज आहे. शिवाय, ब्रिक्स (ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिकेची संघटना) जागतिक आरोग्याच्या समस्येचे निराकरण व्यापक दृष्टीकोनातून आणि स्थानिकीकरणाद्वारे करू शकते, ज्यामध्ये परदेशी मदत स्थानिक संस्थांद्वारे सामायिक केली जाते. एकंदरीत, कोविड-19 च्या राजकीयीकरणाचे परिणाम आणि त्याकडे नेणाऱ्या व्यापक चुकीची माहिती आणि चुकीच्या माहितीच्या मोहिमा लक्षात घेता, ग्लोबल साउथ हे विज्ञान जबाबदारीने प्रसारित केले जावे यासाठी प्रयत्न करू शकते आणि भारतासारखे देश त्यांच्या राष्ट्रीय सुरक्षा चौकटीत जैवसुरक्षेचा समावेश करण्यासाठी त्यांच्या जागतिक समकक्षांच्या बरोबरीने ठोस पावले उचलू शकतात.

कोविड-19, ध्रुवीकृत देशांतर्गत राजकारण आणि भू-राजकीय तणावामुळे जागतिक आरोग्यामध्ये वाढलेल्या सहभागामुळे अमेरिकेला मिळू शकणारे फायदे अस्पष्ट झाले आहेत.

स्पष्टपणे, अमेरिकेने आपल्या परराष्ट्र धोरणात जागतिक आरोग्याची भूमिका बदलण्याचा निर्धार केल्याचे दिसते. कोविड-19, ध्रुवीकृत देशांतर्गत राजकारण आणि भू-राजकीय तणावामुळे जागतिक आरोग्यामध्ये वाढलेल्या सहभागामुळे अमेरिकेला मिळू शकणारे फायदे अस्पष्ट झाले आहेत. असे पाऊल उचलणे शहाणपणाचे नसले तरी, भारत आणि उर्वरित जागतिक दक्षिण भागासाठी जागतिक आरोग्याचा पुनर्विचार करणे उत्प्रेरक ठरू शकते, ज्यामध्ये नक्कीच सुधारणा होणे आवश्यक आहे आणि ज्यांच्या गरजा पूर्ण करणे आवश्यक आहे.

## सैफ अलीवरील हल्ल्याला धार्मिक रंग देण्याचा प्रयत्न- नाना पटोले

**मुंबई**
अभिनेता सैफ अली खानवरील हल्ल्याने बॉलिवूडमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. सैफवरील हल्ला हा हिंदू-मुस्लीम असा नसून तो सुरक्षेचा आणि कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न आहे. परंतु सत्ताधारी भाजपमधील काही लोक त्याला धार्मिक रंग देण्याचा प्रयत्न करत आहेत, असा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी गुरुवारी येथे पत्रकार परिषदेत बोलताना केला.

अभिनेता सुशांतसिंह राजपूतच्या मृत्यू प्रकरणी भाजप सरकारनेच सीबीआय चौकशी केली होती. आजपर्यंत सीबीआयने त्याचा अहवाल दिला नाही. भाजप सरकार हिंदू सुशांतला न्याय देऊ शकले नाही असेच म्हणावे लागले. कायदा सुव्यवस्थेच्या बाबतीतही सत्ताधारी भाजप धार्मिक अजेंडा राबवत असेल तर हे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या महाराष्ट्राचे दुर्दैव आहे, अशी खंत पटोले यांनी व्यक्त केली.

सैफ अली खानवर त्यांच्या घरातच मध्यरात्री हल्ला झाल्याने मुंबईत सुरक्षेचा प्रश्न एरणीवर आला आहे. मुंबई पोलिसांनी हल्लेखोराला अटक केल्याचे जाहीर केले आहे. परंतु सीसीटीव्हीमध्ये दिसलेला हल्लेखोर आणि अटक करण्यात आलेला व्यक्ती यांच्यात साम्य दिसत नसल्याचा दावा केला जात आहे. या प्रश्नी मुंबई पोलिसांनी खुलासा करावा आणि सत्य जनतेसमोर मांडावे, असे आवाहनही पटोले यांनी केले.

मुंबईत सुरक्षित समजल्या जाणाऱ्या वांद्रे भागात अभिनेत्याच्या घरात हल्ला झाल्याने सेलिब्रिटी सुरक्षित नाहीत. याशिवाय गावातील सरपंचही सुरक्षित नाहीत तर राज्यातील सर्वसामान्य जनतेच्या सुरक्षेचे काय? हा कायदा सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न असून निवृत्त पोलीस अधिकाऱ्यांना महत्वाच्या पदावर बसवून सरकार काम करत असून त्याचा हा परिणाम असल्याची टीकाही पटोले यांनी केली.

विधानसभा निवडणुकीवेळी भाजप युतीने लाडकी बहीण योजनेचा गाजावाजा करत सर्व भगिनींना प्रति महिना दीड हजार रुपये दिले. पण आता या योजनेचा लाभ अपात्र बहिणींनी घेतल्याचा साक्षात्कार सरकारला झाला आहे. योजना सुरु करताना सरकारला त्रुटी दिसल्या नाहीत का? बांगलादेशींनी या योजनेचा लाभ घेतला तर हे बांगलादेशी भारतात, महाराष्ट्र आले कसे? केंद्रात मागील ११ वर्षांपासून ५६ इंच छातीवाल्या मोदींचे सरकार आहे. मग मोदी सरकार कमजोर आहे, असे भाजपाला म्हणायचे आहे का? असा सवाल करत पटोले यांनी जनतेच्या पैशाची उधळपट्टी करणाऱ्या सरकारवरच गुन्हा दाखल करण्याची मागणी यावेळी केली.

## बाह्ययंत्रणेद्वारे मेकॅनाईझ्ड क्लिनिंग सेवांना कर्मचारी संघटनेचा तीव्र विरोध
### २९ जानेवारीपासून तीव्र आंदोलनाचा इशारा

**मुंबई**
राज्यात वैद्यकीय, आयुर्वेद, दंत व होमिओपॅथी महाविद्यालये तसेच रुग्णालयांमध्ये बाह्ययंत्रणेद्वारे मेकॅनाईझ्ड क्लिनिंग सेवांचा प्रस्ताव राज्य शासनाने आणल्यावर मुंबई जिल्हा चतुर्थश्रेणी सरकारी कर्मचारी संघटनेने तीव्र विरोध व्यक्त केला आहे. दि. २९ जानेवारीपासून सर्व वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांमधील वर्ग-४ कर्मचारी संघटनेच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. राज्य शासनाने दि. १२ जुलै, २०२४ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार रुग्णालयांमध्ये बाह्ययंत्रणेद्वारे मेकॅनाईझड क्लिनिंग सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु, चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटनेने या निर्णयाला कडाडून विरोध दर्शविला आहे. संघटनेचे म्हणणे आहे की, मुंबईतील जे.जे., सेंट जॉर्ज, कामा व आल्बलेस, जी.टी., पोद्दार आयुर्वेद रुग्णालय अशा महत्त्वाच्या रुग्णालयांमध्ये मंजूर जागांवरील सर्व सफाई कर्मचारी आपली जबाबदारी चोख पार पाडत आहेत.

सर्व रुग्णालयांमध्ये आंतरकक्ष, व्हरांडे, शौचालये, स्नानगृहे यांची स्वच्छता नियमितपणे केली जाते. मुंबई महानगरपालिकेने स्वच्छतेसाठी विविध पुरस्कार देऊन या रुग्णालयांची प्रशंसा केली आहे. त्यामुळे, मेकॅनाईझड क्लिनिंग सेवेची आवश्यकता नाही, असा दावा संघटनेने केला आहे. संघटनेच्या मते, बाह्ययंत्रणेद्वारे स्वच्छता करण्याचा निर्णय आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य असून, सरकारी तिजोरीवर अनावश्यक भार पडणार आहे.

**जून २०२४ च्या घटनेचा दाखला**
संघटनेने जून २०२४ मधील एका घटनेचा संदर्भ दिला, ज्यामध्ये जे.जे. रुग्णालयातील एका चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्याला परिचारिकेने मारहाण केल्याच्या प्रकरणावरून कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन केले होते. त्या आंदोलनादरम्यान कपात केलेले वेतन परत देण्याची मागणी अजूनही प्रलंबित असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

संघटनेने वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या आयुक्तांना दि. २१ जानेवारी रोजी पत्र लिहून मेकॅनाईझ्ड क्लिनिंग सेवांचा निर्णय रद्द करण्याची मागणी केली आहे. तसेच, प्रशासनाने त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय न घेतल्यास दि. २९ जानेवारीपासून मुंबईतील सर्व वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांमधील वर्ग-४ कर्मचारी तीव्र आंदोलन पुकारतील, असा इशारा सरचिटणीस पराग आडिवरेकर यांनी दिला आहे.

या आंदोलनामुळे रुग्णालयांतील सेवा ठप्प होण्याची शक्यता असून, यावर तोडगा काढण्यासाठी प्रशासन काय पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## शिंदे गटाच्या मेळाव्याला दोन बड्या नेत्यांची अनुपस्थिती चर्चेत

**मुंबई**
मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना (शिंदे गट) तर्फे बीकेसी मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या भव्य मेळाव्याला दोन बडे नेते अनुपस्थित राहिल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. शिंदे गटाने हा मेळावा मोठ्या उत्साहात आयोजित केला असला, तरी या दोन नेत्यांच्या गैरहजेरीने पक्षातील अंतर्गत मतभेदांच्या चर्चांना खतपाणी मिळाले आहे.

या मेळाव्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पक्षाच्या पुढील कार्ययोजना आणि आगामी महापालिका निवडणुकांच्या तयारीवर भर दिला. त्यांनी शिवसैनिकांना आवाहन करत गद्दारीच्या आरोपांना प्रत्युत्तर दिले आणि एकजुटीचे महत्व पटवून दिले. याशिवाय, त्यांनी आगामी काळात शिंदे गट अधिक बळकट होईल आणि पक्षाच्या मूलभूत तत्त्वांशी निष्ठा कायम ठेवेल, असे आश्वासन दिले.

या मेळाव्यात दोन प्रमुख नेते, आरोग्य मंत्री तानाजी सावंत आणि माजी मंत्री अब्दुल सत्तार हे अनुपस्थित राहिल्याने राजकीय चर्चा रंगल्या आहेत. शिंदे गटातील हे महत्त्वाचे नेते असूनही, त्यांच्या गैरहजेरीने पक्षातील अंतर्गत मतभेदांची शक्यता वर्तवली जात आहे.

याबाबत अद्याप कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण दिले गेलेले नाही. मात्र, काही सूत्रांचे म्हणणे आहे की, महापालिका निवडणुकांतील तिकीट वाटपावरून किंवा काही अंतर्गत निर्णयांवर नाराजी असल्यामुळे हे नेते मेळाव्याला उपस्थित राहिले नसावेत. काहींनी त्यांच्या अनुपस्थितीला वैयक्तिक कारणे जबाबदार ठरवले आहे.

या दोन नेत्यांच्या अनुपस्थितीमुळे आगामी महापालिका निवडणुकीत शिंदे गटाच्या एकजुटीवर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पक्षाची एकात्मता आणि निवडणुकीसाठीची तयारी यात अडथळे निर्माण होऊ शकतात. शिंदे गटाने सध्या चर्चांवर भाष्य न करता या प्रकरणाला थोपवण्याचा प्रयत्न केला आहे.

पक्षाच्या काही नेत्यांनी माध्यमांशी बोलताना असे सांगितले की, अनुपस्थित नेते पक्षाशी निष्ठावान आहेत आणि त्यांच्या अनुपस्थितीमागे केवळ व्यक्तिगत कारणे आहेत. मात्र, यासंबंधी अधिकृत स्पष्टीकरण अद्याप दिलेले नाही.

## उद्धव ठाकरेंवर रामदास कदमांचा घणाघात
### शिंदे गटाकडून टीकेचा भडिमार

**मुंबई**
शिवसेनेचे शिंदे गटातील नेते रामदास कदम यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. "उद्धव ठाकरे वैफल्यातून वक्तव्य करत आहेत," असा आरोप करत कदम यांनी विविध मुद्द्यांवरून ठाकरेंना लक्ष्य केले.

कदम म्हणाले, "उद्धव ठाकरे लंडनला नेमके कशासाठी जातात, हे त्यांनी स्पष्ट करावे. त्यांच्याकडे असलेले उरलेसुरले आमदार आणि खासदार ते सांभाळू शकतील का, याची शंका आहे." त्यांनी ठाकरे यांच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत म्हटले, "जनतेनेच गद्दार कोण, हे दाखवून दिले आहे. जनतेने उद्धव ठाकरेंचा सुपडा साफ केला असून कालच्या सभेत खुर्च्या मोकळ्या होत्या."

रामदास कदम यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कामगिरीचे कौतुक करताना ठाकरेंवर टीका केली. "एकनाथ शिंदेंनी आपले कर्तृत्व दाखवले आहे. गाडून टाकण्याची भाषा उद्धव ठाकरेंना शोभत नाही. नियतीनेच त्यांना धडा शिकवला आहे," असे ते म्हणाले. कदम यांच्या या टीकेमुळे ठाकरे गटाला मोठा राजकीय धक्का बसण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रातील शिवसेनेतील फुटीनंतर दोन्ही गटांमध्ये वाद अधिकच तीव्र झाला असून, पुढील काळात हा वाद आणखी चिघळण्याची शक्यता आहे.

## संक्षिप्त

### माजी सैनिकांच्या १७८० रिक्त जागांवर राखीव प्रवर्गातील पात्र उमेदवारांना संधी द्या

**मुंबई**
जिल्हा परिषद अंतर्गत २०२३ सरळसेवा पदभरतीतील माजी सैनिक घटकातील उमेदवारांच्या १७८० रिक्त जागांवर त्याच राखीव प्रवर्गामधील गुणवत्तेनुसार इतर पात्र उमेदवारांना संधी द्या, या मागणीसाठी राष्ट्रीय मुलनिवासी बहुजन कर्मचारी संघाने गुरुवारी आझाद मैदानात आंदोलन केले. ग्रामविकास विभागाने ११ डिसेंबर २०२४ला काढलेल्या आदेशाप्रमाणे राज्यातील ८ जिल्हा परिषदेने माजी सैनिकांच्या या रिक्त जागा रुपांतरित करुन गुणवत्तेच्या आधारे पात्र उमेदवारांना सरळसेवेत भरती करुन घेतले असल्याचे संघाचे प्रदेशाध्यक्ष प्रेमराज बोबडे यांनी सांगितले. २०२३ ला जिल्हा परिषद अंतर्गत सरळसेवा भरती विविध पदासाठी भरती प्रक्रिया राबविण्यात आली. या भरतीतील वर्ग - तीनची गुणवत्ता यादी वेबसाईटवर जाहीर झाली. त्या यादीमध्ये माजी सैनिक या समांतर आरक्षणामधील पात्र उमेदवार उपलब्ध नसल्याने राखीव ठेवलेली सर्व पदे रिक्त आहेत. दरम्यान, ग्रामविकास विभागाने ११ डिसेंबर २०२४ ला रिक्त राहिलेल्या सर्व जागा रुपांतरित करुन गुणवत्तेच्या आधारे सामान्य प्रशासन विभागाच्या नियमाप्रमाणे तत्काळ भराव्यात असा शासन आदेश काढला.

### बांधकाम कामगारांचे पोर्टल सुरू करण्याची कृती समितीची मागणी

**मुंबई**
बांधकाम कामगारांचे सर्व पोर्टल त्वरीत सुरू करण्यात यावे, असे निवेदन बांधकाम कामगारांनी प्रजासत्ताक दिनी रविवारी प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पालकमंत्र्यांना द्यावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना संयुक्त कृती समितीने केले आहे, अशी माहिती समिती निमंत्रक शंकर पुजारी यांनी दिली. शंकर पुजारी म्हणाले, बांधकाम कामगार विषयक पोर्टल सुरू करण्याचे उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात निर्णय करा, असे केंद्रीय श्रम मंत्रालयामार्फत राज्याचे कामगार सचिव व प्रधान सचिवांना ईमेलद्वारे आदेश दिले आहे. तसेच केंद्रीय कामगार व रोजगार मंत्री मनसुख मांडविया यांना याबाबत निवेदन ईमेलद्वारे पाठवले होते त्यावर माडविया यांनी, याबाबत कारवाई करण्याचे आदेश महाराष्ट्र कामगार मंत्रालयास दिले. मात्र या आदेशाची अंमलबजावणी शासन व कामगार मंडळाकडून होत नाही. कामगार मंत्री व सचिवांना या संदर्भात भेटूनही त्याचा काही उपयोग होत नसल्याचा आरोप पुजारी यांनी केला.

### 'जात' प्रवर्ग वगळून हॉलतिकीट वाटप सुरू

**मुंबई**
दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांच्या हॉल तिकिटांवरील जात प्रवर्ग उल्लेख वगळण्याचा निर्णय दै. पुढारीच्या दणक्यानंतर घेतल्यानंतर आता प्रत्यक्षात गुरुवारपासून बारावीच्या विद्यार्थ्यांना जात प्रवर्ग काढलेली हॉलतिकिटे मिळण्यास प्रारंभ झाला आहे. राज्यभरातून विरोध झाल्यावर शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आदेश दिल्यानंतर मंडळाने जात प्रवर्ग नमूद केलेला हा निर्णय रद्द केला. नव्याने हॉल तिकीट देण्याचे आदेश दिले, यानंतर दहावीच्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या हॉलतिकिटांचा जातीचा उल्लेख वगळूनच वितरीत करण्यात येत आहेत. यानंतर बारावीच्या विद्यार्थ्यांना सुधारित हॉलतिकिटे गुरुवारपासून उपलब्ध करण्यात आली आहेत त्यानुसार सुधारित ऑनलाइन पद्धतीने हॉलतिकीट उपलब्ध झाली असल्याचे पालकांनी सांगितले.

### संजय राठोड यांना दिलासा

**मुंबई**
पुण्यात ८ फेब्रुवारी २०२१ रोजी इमारतीच्या पहिल्या मजल्यावरून पडून झालेल्या तरुणीच्या मृत्यूप्रकरणी माजी वनमंत्री संजय राठोड यांच्याविरोधात एफआयआर दाखल करण्याची मागणी करणारी जनहित याचिका उच्च न्यायालयाने निकाली काढली आहे. त्यामुळे राठोड यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

राज्य सरकार, भाजपच्या याचिकाकर्त्या चित्रा वाघ आणि संबंधित तरुणीच्या पालकांनी विनंती केल्यानंतर मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती भारती डांगरे यांच्या खंडपीठाने याचिका निकाली काढली. याप्रकरणी राठोड यांच्यावर एफआयआर दाखल करून सीबीआयकडे तपास सोपविला जावा, अशी याचिका वाघ यांनी चार वर्षांपूर्वी उच्च न्यायालयात दाखल केली होती.

गुरुवारी झालेल्या सुनावणीवेळी राज्य सरकारच्या वतीने महाधिवक्ता वीरेंद्र सराफ यांनी बाजू मांडली. संबंधित तरुणी मद्याच्या नशेत घराच्या गच्चीत फिरत होती. त्यावेळी, गच्चीवरून पडून तिचा मृत्यू झाला. डोक्याला दुखापत झाल्याने तिचा मृत्यू झाल्याचे शवविच्छेदन अहवालात स्पष्ट झाल्याचे ॲड. सराफ यांनी खंडपीठाच्या निर्दशनास आणून दिले.

### इंदू मिल येथील स्मारकाचे काम दर्जेदार करा : सामाजिक न्यायमंत्री शिरसाट

**मुंबई**
दादरच्या इंदू मिल येथे उभारण्यात येत असलेल्या भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे एप्रिल २०२६ पर्यंत अनावरण करण्याचा सरकारचा मानस असून, स्मारकाचे काम दर्जेदार करावे, अशा सूचना सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी दिल्या. इंदू मिल येथील स्मारकाच्या कामाच्या पाहणीनंतर शिरसाट यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या. सध्या येथील इमारतीचे काम जवळपास पूर्ण झाले असून, स्मारकाचे काम प्रगतिपथावर आहे.

### अक्षयच्या 'स्काय फोर्स'ला न्यायालयाचा हिरवा कंदील

**मुंबई**
कॉपीराईट उल्लंघनाच्या आरोपामुळे वादाच्या भोवऱ्यात अडकलेला 'स्काय फोर्स' हा अक्षय कुमारचा चित्रपट प्रदर्शित होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. न्यायमूर्ती मनीष पितळे यांच्या न्यायालयाने चित्रपटाचे प्रदर्शन रोखण्यास नकार दिला. त्यामुळे हा चित्रपट शुक्रवारी चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे. कॉपीराईटचे उल्लंघन झाल्याने या चित्रपटाच्या प्रदर्शनाला स्थगिती द्या, अशी याचिका दिग्दर्शक संदीप गंगटकर यांनी उच्च न्यायालयात दाखल केली होती.

## म्हाडा व पोलीस गृहनिर्माण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पोलीस वसाहतींच्या पुनर्विकासाचा निर्णय

**मुंबई**
मुंबई शहर व उपनगरातील पोलीस वसाहतींची दुरवस्था लक्षात घेता त्यांचा पुनर्विकास करण्यासाठी म्हाडा आणि पोलीस गृहनिर्माण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने प्रस्ताव तयार करण्यात आला असून तो अंतिम टप्प्यात असल्याचे गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम यांनी सांगितले. या संदर्भात आयोजित बैठकीत त्यांनी माहिती दिली.

मुंबईतील पोलीस वसाहतींच्या पुनर्विकासाची गरज ओळखून खासदार रविंद्र वायकर यांनी याबाबत गृह राज्यमंत्री योगेश कदम यांना निवेदन दिले होते. या निवेदनाच्या अनुषंगाने एमआयडीसी येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. वसाहतींच्या पुनर्विकासासंबंधी धोरणात्मक निर्णय घेण्याची अपेक्षा असल्याचे वायकर यांनी सांगितले.

मोडकळीस आलेल्या पोलीस ठाण्यांचा (जसे आरे, मेघवाडी, जोगेश्वरी) पुनर्विकास आणि दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवण्यात येणार आहे. गृह विभागाकडे निधी उपलब्ध असल्याने ही कामे लवकरच सुरू होतील, असे आश्वासन कदम यांनी दिले.

कालबाह्य गाड्या रस्त्यावर ठेवून वाहतुकीला अडथळा निर्माण होत असल्याने परिवहन विभागाच्या मार्फत स्क्रॅपिंग सुविधा सुरू करण्यात येणार आहे. ही सुविधा वर्षभरात कार्यान्वित होईल, अशी ग्वाही कदम यांनी दिली.

**अनधिकृत पार्किंग, फेरीवाले आणि ड्रग्स विरोधातील कारवाईचा आदेश**

रस्त्यांवरील अनधिकृत पार्किंग, फेरीवाले, गॅरेजेस यांच्यावर त्वरित आणि कडक कारवाई करण्यात यावी, अशा सूचना कदम यांनी दिल्या. तसेच तक्षशीला, आरे, दुर्गानगर, जोगेश्वरी, अंधेरी गुंफा, सात बंगला, कुरार या भागांतील ड्रग्स विक्रीच्या घटनांवर त्वरित कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

**सीसीटीव्ही आणि वाहतूक नियंत्रणासाठी उपाययोजना**

वाहतूक व्यवस्थापन सुधारण्यासाठी विविध ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचे निर्देश देण्यात आले. सिग्नलवर भीक मागणाऱ्या भिकाऱ्यांबाबत आणि तृतीयपंथीयांच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे, असेही बैठकीत नमूद करण्यात आले.

श्यामनगर येथे आमदार निधीतून बांधण्यात आलेल्या पोलीस बीट चौकीचा अपेक्षित उपयोग न झाल्याने, ती महिलांच्या सक्षमीकरणासाठी वापरण्याची मागणी वायकर यांनी केली. बीट चौकीवरील त्यांचे नावाचे फलक काढल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.

जोगेश्वरी व आरे भुयारी मार्गाच्या कामासाठी परवानगी देण्याची मागणी करण्यात आली. तसेच गोरेगाव पूर्वेतील नेस्को सेंटर येथे प्रदर्शनादरम्यान होणाऱ्या वाहतूक कोंडीसाठी उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले.

वायकर यांनी अनधिकृत बारांवरही त्वरित कारवाई करण्याची मागणी केली.

या बैठकीत पश्चिम उपनगराचे अतिरिक्त पोलीस आयुक्त परमजीत दहिया, पोलीस उपायुक्त सचिन गुंजाळ, म्हाडाचे अधिकारी अनिकेत मोझे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी नितीन पगारे आणि विविध पोलीस ठाण्यांचे वरिष्ठ अधिकारी तसेच स्थानिक प्रतिनिधी उपस्थित होते.

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यटन प्रकल्प गतीने पूर्ण करा - पर्यटनमंत्री शंभूराज देसाई

**मुंबई**
सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यटनाला अधिक गती मिळावी म्हणून राज्यस्तरावर विशेष समिती स्थापन करण्यात येणार असून, जिल्ह्यातील ताज प्रकल्प आणि इतर पर्यटन प्रकल्प लवकर पूर्ण करण्यासाठी आवश्यक त्या परवानग्या तातडीने घेण्याचे निर्देश पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले आहेत.



मंत्रालयात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यटन विकासाच्या संदर्भात आयोजित बैठकीत देसाई बोलत होते. या बैठकीला माजी शिक्षणमंत्री व आमदार दीपक केसरकर, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, पर्यटन संचालक डॉ. बी. एन. पाटील, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मनोज सूर्यवंशी, मत्स्यव्यवसाय आयुक्त किशोर तावडे, तसेच दूरदृश्यप्रणालीद्वारे सिंधुदुर्गचे जिल्हाधिकारी अनिल पाटील व इतर विभागीय अधिकारी उपस्थित होते.

पर्यटनमंत्री देसाई यांनी बैठकीत सांगितले की, सिंधुदुर्ग हा राज्यातील पहिला पर्यटन जिल्हा असून, या जिल्ह्यातील पर्यटन विकासासाठी विविध महत्त्वाचे प्रकल्प सुरू आहेत. पर्यटनाच्या प्रलंबित योजना आणि सवलतींच्या अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय समितीची स्थापना करण्यात येईल. या समितीच्या माध्यमातून पर्यटन विकासाला गती मिळेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

**पर्यावरणस्नेही प्रकल्पांवर भर**

ताज प्रकल्पासाठी पर्यावरणाशी सुसंगत राहून आवश्यक त्या परवानग्या घेण्याचे आदेश देण्यात आले असून, स्थानिक नागरिकांचा विश्वास संपादन करून हा प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यावर भर दिला जाईल, असेही त्यांनी सांगितले. याशिवाय, "चांदा ते बांदा" या योजनेअंतर्गत मंजूर कामांसाठी वर्ग करण्यात आलेल्या निधीची कामे गतीने पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

**महत्त्वाच्या पर्यटन प्रकल्पांना गती**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील "सिंधुरत्न योजना", सुरू होणारी सबमरीन सेवा, दोडामार्ग तालुक्यातील तिलारी पाटबंधारे प्रकल्पात प्रस्तावित वॉटर स्पोर्ट्स यासारख्या प्रकल्पांना लवकरात लवकर गती देण्याचे आदेश देण्यात आले.

यावेळी आमदार दीपक केसरकर यांनी पर्यटन विभागाने सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या विकासासाठी विशेष लक्ष केंद्रित करावे आणि जिल्ह्यातील प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी अधिक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी विनंती केली.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील या पर्यटन प्रकल्पांचे वेगवान आणि प्रभावी अंमलबजावणीमुळे जिल्ह्याचा विकास अधिक वेगाने होईल, अशी अपेक्षा या बैठकीत व्यक्त करण्यात आली.

## गेल्या 23 दिवसात 11 वाघांचा मृत्यू वन विभागाची माहिती

**मुंबई**
राज्यात गेल्या २३ दिवसात ११ वाघांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती वन विभागाने गुरुवारी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. १ जानेवारी २०२५ पासून पाच वाघांचा नैसर्गिक तर ३ वाघांचा अपघातात मृत्यू झाला आहे. अन्य ३ वाघांची शिकार करण्यात आली असून याबाबत चौकशी सुरु असल्याचे वन विभागाने पत्रकात म्हटले आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी आणि वनपरिक्षेत्रात २ जानेवारी २०२५ रोजी वाघांच्या आपसातील हल्ल्यात मृत्यू झाला. भंडारा जिल्ह्यातील तुमसर वनपरिक्षेत्रात ६ जानेवारीला एका वाघिणीचा विजेच्या धक्क्यामुळे मृत्यू झाला. या वाघाच्या शिकारीत सहभागी असलेल्या तीन आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. पांढरकवडा वनविभाग अंतर्गत वणी येथे ७ जानेवारीला एका वाघिणीचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत सापडला असून या वाघिणीचे दात, पंजे गायब असल्याने या प्रकरणाचा तपास सुरू आहे. नागपूरच्या देवलापार वनपरिक्षेत्रात ८ जानेवारीला एका बछड्याचा विजेचा धक्का देऊन मृत्यू झाला असल्याचे आढळून आल्याने या प्रकरणाचा तपास सुरू आहे. ताडोबा अंधारी व्याघ्र वनक्षेत्रातील मूल वनपरिक्षेत्रात ९ जानेवारी रोजी एका बछड्याचा नैसर्गिक मृत्यू झाला.

गोंदिया येथील दासगाव वनपरिक्षेत्रात १४ जानेवारी रोजी आजारपणामुळे एका वाघाचा मृत्यू झाला असून या प्रकरणाचा तपास सुरू आहे. नागपूर येथील देवलापार वनपरिक्षेत्रात १५ जानेवारीला एका बछड्याचा नैसर्गिक मृत्यू झाला. ब्रह्मपुरी वनक्षेत्रातील सिंदेवाही वनपरिक्षत्रात १९ जानेवारी रोजी रेल्वेला धडकून अपघात झाला आहे. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प शिवणी वनपरिक्षेत्रातील एका बछड्याचा २० जानेवारीला नैसर्गिक मृत्यू झाला. तर २१ जानेवारी रोजी पेंच व्याघ्र प्रकल्प नागलवाडी वनपरिक्षेत्रात एका वाघाचा नैसर्गिक मृत्यू झाला आहे. तसेच वर्धा वनविभागातील समुद्रपूर येथे एका बछड्यांचा रस्ते अपघातात मृत्यू झाला असून शवविच्छेदन अहवाल अद्याप प्राप्त झाला नसल्याचे वन विभागाने कळविले आहे.

## टोपीवाला महानगरपालिका मंडईतील गाळेधारकांच्या पुनर्वसनाला प्राधान्य द्यावे- महानगरपालिका आयुक्त

**मुंबई**
गोरेगाव पश्चिम येथील प्रस्तावित टोपीवाला महानगरपालिका मंडईला महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. भूषण गगराणी यांनी आज (दिनांक २३ जानेवारी २०२५) भेट देत बांधकामाची पाहणी केली. गाळेधारकांना वापरासाठीची जागा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही वेगाने पूर्ण करावी तसेच गाळेधारकांच्या पुनर्वसनासाठी प्राधान्य द्यावे अशा सूचना श्री. गगराणी यांनी यावेळी दिल्या.

स्थानिक आमदार श्रीमती विद्या ठाकूर, उपआयुक्त (पायाभूत सुविधा) श्री. उल्हास महाले, संचालक (अभियांत्रिकी) श्री. गोविंद गारूळे, नगर अभियंता श्री. महेंद्र उबाळे, सहायक आयुक्त (बाजार) श्री. मनीष वळंजू, सहायक आयुक्त (पी उत्तर) श्री. संजय जाधव, उप प्रमुख अभियंता श्री. यतीश रांदेरिया, कार्यकारी अभियंता श्री. प्रीतम सातर्डेकर यांच्यासह संबंधित अधिकारी, अभियंता यावेळी उपस्थित होते.



टोपीवाला महानगरपालिका मंडईचा पुनर्विकास महानगरपालिकेने हाती घेतला आहे. गोरेगाव पश्चिम येथील मौजे पहाडी गोरेगाव येथे उभारण्यात येणारी ही इमारत १६ मजली आहे. या इमारतीत ८०० आसन क्षमतेच्या सुसज्ज नाट्यगृहाचा समावेश आहे. मंडईत एकूण २०६ गाळे असतील. त्यात तळ मजल्यावर ११२ गाळे आणि पहिल्या मजल्यावर ९४ गाळ्यांचा समावेश आहे. याचबरोबर इमारतीत एकूण ५३ रहिवासी सदनिकांची तरतूद करण्यात आली आहे. तर, १९२ वाहनांसाठी वाहनतळ उपलब्ध असेल. छतावर मनोरंजन सुविधा आणि खेळासाठी जागा आरक्षित आहे. या इमारतीचा पुनर्विकास ३० महिन्यांच्या कालावधीत करण्याचे नियोजित आहेत. सुमारे ३ हजार ४३८ चौरस मीटर क्षेत्रफळावर आकर्षक अशी ही इमारत उभारण्यात येत आहे. स्थळ पाहणी केल्यानंतर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. गगराणी म्हणाले की, गाळेधारकांना जागा उपलब्ध करून देण्यासाठी इमारतीची बांधकाम प्रक्रिया वेगाने करावी. येत्या वर्षभरात ही जागा वापरासाठी यावी म्हणून प्रकल्पाशी संबंधित बाबींची अंमलबजावणी करावी. गाळेधारकांना दिलासा म्हणून पुनर्वसनाच्या अनुषंगाने सुरूवातीच्या टप्प्यात दोन मजल्यांचे बांधकाम पूर्ण करावे, जेणेकरून गाळेधारकांना ही जागा व्यवसायासाठी वापरणे शक्य होईल, असेही श्री. गगराणी यांनी सांगितले.

## चेक बाऊंस प्रकरणात रामगोपाल वर्माला तीन महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा

**मुंबई**
बॉलिवूडचा प्रसिद्ध दिग्दर्शक रामगोपाल वर्माला 3 महिन्यांच्या तुरुंगावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. दिग्दर्शकाने 2018 साली एका चित्रपटाच्या आर्थिक व्यवहाराशी संदर्भाने चेक बाऊंस झाल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी, आता जवळपास 7 वर्षांनी न्यायालयात अंतिम सुनावणी झाली असू आरोपी रामगोपाल वर्माला दोषी ठरवण्यात आलं आहे. या सुनावणीवेळी आरोपी दिग्दर्शक वर्मा न्यायालयात हजर नव्हता. आपल्या वादग्रस्त वक्तव्याने व ट्विटमुळे चर्चेत असलेल्या रामगोपाल वर्मा यांच्याविरुद्ध 2018 साली श्री नावाच्या कंपनीने फिर्याद दिल्यानंतर गुन्हा दाखल झाला होता. त्यामध्ये, रामगोपाल वर्माला दोषी ठरवून न्यायालयाने शिक्षा सुनावली आहे. विशेष म्हणजे उद्या रामगोपाल वर्माकडून 'सिंडिकेट' या नव्या चित्रपटाची घोषणा करण्यात येणार आहे.

दिग्दर्शक रामगोपाल वर्मा सध्या 'सत्या' सिनेमाच्या शुटींगमध्ये व्यक्त असून सत्या सिनेमाची सिनेसृष्टीत जोरदार चर्चा आहे. मात्र, त्याच दरम्यान, 7 वर्षांपूर्वीच्या एका चेक बाऊंस प्रकरणात न्यायालयाने रामगोपाल वर्माला तीन महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली आहे. 21 जानेवारी रोजी रामगोपाल वर्माला न्यायालयात सुनावणीसाठी बोलवण्यात आले होते, मात्र ते हजर राहिले नाहीत. त्यानंतर, न्यायालयाने फिर्यादीला 3.72 लाख रुपये मोबदला म्हणून देण्याचे निर्देश दिले. न्यायालयाने निगोशिएबल इंस्ट्रूमेंट्स ॲक्टच्या कलम 138 अन्वये आरोप ठेवत आरोपीला दोषी ठरवले आहे. त्यामध्ये, 3 महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

अंधेरी सत्र न्यायालयात गेल्या 7 वर्षांपासून हा खटला सुरू असून रामगोपाल वर्माविरुद्ध अजामीनपात्र वॉरंटही जारी करण्यात आलं आहे. याप्रकरणातील अंतिम सुनावणीवेळ आरोपी न्यायालयात हजर नसल्याने त्याविरुद्ध अजामीनपात्र वॉरंट जारी केलं पाहिजे, असे न्यायालयाने म्हटले. तसेच, संबंधित पोलीस स्टेशनमध्ये आरोपीला अटक केली पाहिजे आणि तक्रारदारास पुढील तीन महिन्यात 3 लाख 72 हजार रुपयांची रक्कम देण्यात यावी, असे निर्देशच न्यायालयाने दिले आहेत. तसेच, तीन महिन्यात 3 लाख 72 हजार रुपये न दिल्यास आरोपीला तीन महिने तुरुंगवासाची शिक्षा भोगावी लागणार आहे. दरम्यान, श्री कंपनीचे प्रमुख महेशचंद्र मिश्रा यांनी चेक बाऊंसप्रकरणी हा खटला दाखल केला होता.

## पत्रकार विकास संघाचे 17वे लिट्टी-चोखा स्नेह संमेलन संपन्न

**मुंबई**
पत्रकार विकास संघ (PVS) च्या संयुक्त विद्यमाने 17 वे लिट्टी-चोखा स्नेह संमेलन गोरेगाव पश्चिम येथील ब्रह्मा-महेश मैदानावर मोठ्या दिमाखात संपन्न झाले. “दिल की बात, लिट्टी-चोखा” या थीमवर आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला पत्रकार, साहित्यिक, राजकारणी, सामाजिक कार्यकर्ते आणि पोलिसांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.



यावेळी शिवसेना नेते संजय निरुपम यांनी छत्तीसगडमधील पत्रकार मुकेश चंद्राकर यांच्या हत्येचा उल्लेख करताना पत्रकारांच्या सुरक्षेबाबत तीव्र चिंता व्यक्त केली. ते म्हणाले, "खरी पत्रकारिता आता खेड्यापाड्यात आणि शहरांमध्ये होत आहे, जिथे पत्रकार त्यांच्या जिवाची पर्वा न करता सत्य समोर आणत आहेत."

भाजप नेते कृपाशंकर सिंह म्हणाले की, अशा कार्यक्रमांमुळे पत्रकारांना तणावमुक्त संवादाची संधी मिळते. त्याचबरोबर माजी मंत्री व आमदार अस्लम शेख यांनी पीव्हीएसच्या या कार्यक्रमाचे कौतुक करून आपल्या जुन्या आठवणींना जोडले.

भाजप नेते आचार्य पवन त्रिपाठी यांनी या परिषदेची तुलना प्रयागराजच्या महाकुंभाशी केली आणि ती अद्वितीय असल्याचे वर्णन केले. शिवसेना (उभा) प्रवक्ते आनंद दुबे आणि भाजप नेत्या विद्या ठाकूर यांनीही पत्रकारांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. भाजप नेते अमरजीत मिश्रा यांची विशेष उपस्थिती होती.

या परिषदेत प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल माध्यमातील पत्रकार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी उत्तर भारतीय संघाचे अध्यक्ष संतोष आर.एन.सिंह, हिंदी पत्रकार संघाचे अध्यक्ष आदित्य दुबे, अमित मिश्रा, अमर त्रिपाठी, विनोद शेलार, डॉ.एन. एन. पांडे, ॲड. अखिलेश चौबे, माजी नगरसेवक विनोद मिश्रा, कमलेश यादव, ॲड. इंदरपाल सिंग, परमिंदर सिंग भामरा, दीपक ठाकूर, उदय प्रताप सिंह, योगेश वर्मा, संतोष सिंग, अनिल गलगली, गंगाराम जमनानी, अनुराग त्रिपाठी, सुनील मेहरोत्रा, अभय मिश्रा, शैलेंद्र श्रीवास्तव, विवेक अग्रवाल, मनसेचे सचिव वागीश सरस्वत, डीसीपी सारस्वत, पोलीस विभागाकडून आनंद भोईटे आणि स्मिता पाटील, निवृत्त एसीपी राजन घुले आणि वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजय कुमार पन्हाळे, ज्योती भोपळे, रवींद्र पाटील, हृदय मिश्रा यांची उपस्थिती मान्यवर होती. लोकगायक सुरेश शुक्ला यांच्या संगीत सादरीकरणाने सर्वांना मंत्रमुग्ध केले.

पीव्हीएसचे अध्यक्ष आनंद प्रकाश मिश्रा, सल्लागार सुनील सिंह आणि सरचिटणीस अजय सिंह यांनी बनारसी गमछा देऊन पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्येष्ठ पत्रकार भानुप्रकाश मिश्रा, समिउल्ला खान, धर्मेंद्र पांडे, आलम पठाण, मुरारी सिंग, वसीम हैदर, विक्रम जादव, संतोष पांडे, अब्दुल चौधरी, तुफैल खान, देवांश मिश्रा, युवराज सिंह व इतर सदस्यांचे विशेष सहकार्य लाभले.

## प्रेमाने मागा सगळे देऊन टाकू, माझी कोणत्याही पदासाठी महत्वाकांक्षा नाही - सुप्रिया सुळेंचे सूचक वक्तव्य

**कोल्हापूर, दि. २४ प्रतिनिधी**
मानं मागा सगळं देऊन टाकू, खाली हाथ आये थे खाली हात जायेंगे असं वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केलं आहे. इलेक्शन येतात आणि जातात पण रिश्ते हमेशा रहते है असंही सुळे म्हणाल्या. मी कोणत्याही पदासाठी महत्वकांक्षी नाही. पण हे अनेकांना पटत नाही असेही सुळे म्हणाल्या. त्या कोल्हापुरमध्ये बोलत होत्या.

माझ्या निवडणुकीत हे लक्षात आलं की कोणी आपल्या सोबत नसलं तरी चालेल पण जनता आपल्या सोबत असायला हवी, तुम्हाला कुणीही हरवू शकत नाही असे सुळे म्हणाल्या. सगळी यंत्रणा माझ्या विरोधात होती. आमदार, खासदार, सरपंच सुद्धा माझ्यासोबत नव्हते. तरी जनतेनं मला निवडून आणलं असे सुळे म्हणाल्या.

**शरद पवार हे कधी रिटायर्ड होतील हे मला माहित नाही**

माझ्या वडिलांचे (शरद पवार) कोल्हापूरवर मोठं प्रेम असल्याचे सुळे म्हणाल्या. आमचे वडील कधी रिटायर्ड होतील असं अनेकांना वाटतं. पण ते कधी रिटायर्ड होतील हे मला माहित नाही असेही सुळे म्हणाल्या. आबिटकर साहेब तुमचा पक्ष फुटला कारण नेते वेळ देत नाहीत म्हणून आणि आमचा पक्ष फुटला नेते जास्त वेळ देतात म्हणून असेही सुळे म्हणाल्या. खात्यातील फाईलींबद्दल बोलायला अभ्यास लागत नाही, इतिहासावर बोलायला जास्त अभ्यास करावा लागतो असे सुळे म्हणाल्या. मला आता एकायला शिकवलं आहे. बोलण्यापेक्षा एकण्यात खूप शक्ती लागते असे सुळे म्हणाल्या. म्हणूनच मी लोकसभेला जिंकलो आहे. आरे ला का रे केलं असतं तर निवडून आलो नसतो असेही सुळे म्हणाल्या.

मराठी अक्रॉस मुंबई

जानकारी

# हाथ धोने के लिए पानी ठंडा हो या गर्म

## जानें बैक्टीरिया मारने में कौन सबसे ज्यादा असरदार

हाथ धोने का महत्व आज ज्यादातर लोग समझ चुके हैं। जो लोग अब भी गंदे हाथों से खाना-पीना करते हैं, उनके लिए 1 से 7 दिसंबर तक हैंडवॉशिंग अवेयरनेस वीक यानी हाथ धो कर साफ रखने के लिए जागरूकता सप्ताह मनाया जा रहा है। ठंड के मौसम में इस तरह की सफाई का ख्याल रखना और जरूरी हो जाता है, क्योंकि ठंडे पानी से हर कोई दूर रहना चाहता है। कई लोग यह दलील देते हैं कि गर्म पानी से हाथ धोना फायदेमंद होता है और इससे बैक्टीरिया ज्यादा मरते हैं। लेकिन क्या यह बात सच है? ताजा वैज्ञानिक अध्ययन में इस बात का जवाब दिया गया है कि क्या गर्म पानी और ठंडे पानी से हाथ धोने में कोई फर्क है?

जर्नल ऑफ फूड प्रोटेक्शन में प्रकाशित ताजा रिसर्च के अनुसार, हाथ गर्म पानी से धोए जाएं या ठंडे से, कोई फर्क नहीं पड़ता है। खतरनाक बैक्टीरिया का सफाया करने में दोनों समान रूप से कारगर हैं। इतना जरूर है कि गर्म पानी में साबुन अच्छी तरह पिघल जाता है। इससे भी कई लोगों को लगता है कि गर्म पानी ज्यादा आसानी से बैक्टीरिया मारता है, लेकिन अब यह बात गलत साबित हुई है।

नए अध्ययन में विभिन्न पहलुओं से गर्म और ठंडे पानी के असर की जांच की गई, जैसे साबुन की मात्रा, पानी का तापमान, हाथ धोने में लगाया गया समय और साबुन कितना असरदार है।



### 10 सेकंड तक धोएं हाथ, पानी गर्म हो या ठंडा

अध्ययन में पाया गया कि पानी के तापमान का बैक्टीरिया को कम करने पर महत्वपूर्ण प्रभाव नहीं पड़ा। चाहे यह 38 डिग्री सेल्सियस या 16 डिग्री सेल्सियस था, शोधकर्ताओं ने बैक्टीरिया में कमी में कोई अंतर नहीं पाया। इसके अलावा, अध्ययन से पता चला कि कीटाणुओं को दूर करने के लिए 10 सेकंड तक हाथ धोना काफी प्रभावी होता है।

### ठंड में बरतें यह सावधानी

ठंड में कई लोगों को सुखी त्वचा की समस्या से जूझना पड़ता है, खासतौर पर ऐसा हाथों में अधिक होता है। अक्सर साबुन में पाए जाने वाले रसायन हाथों की त्वचा को ड्राय बना देते हैं। ऐसे लोगों को साबुन से हाथ धोने से बचना चाहिए। जो लोग पानी के संपर्क में बहुत समय बिताते हैं, उन्हें रबर के दास्ताने पहनकर काम करना चाहिए। लंबे समय तक पानी के संपर्क में रहने से हाथ ड्राय हो सकते हैं क्योंकि यह त्वचा में मौजूद प्राकृतिक ऑयल को धो देता है।

### पानी का काम नहीं कर सकता हैंड सैनिटाइजर

डॉ. दीप्शा अग्रवाल के अनुसार, हैंड सैनिटाइजर का उपयोग हाथ साफ करने के लिए किया जाता है, लेकिन साबुन से हाथ धोने से अच्छा कुछ भी नहीं है। इससे ही हमारे हाथों पर जमे कीटाणु 100 फीसदी तक खत्म हो सकते हैं। इसलिए हैंड सैनिटाइजर का उपयोग वहीं करना चाहिए, वहां पानी से हाथ धोने की सुविधा नहीं है। हैंड सैनिटाइजर खरीदते समय ध्यान रखें कि कहीं उसमें ट्राइक्लोसेन या थाइलेड्स कैमिकल तो नहीं हैं। ये दोनों कैमिकल हानिकारक होते हैं। खासतौर पर थाइलेड्स त्वचा के जरिए ब्लड में जा सकता है और बहुत नुकसान पहुंचा सकता है।



ड्राई स्किन या सूखी त्वचा असल में बड़ी समस्या नहीं है, लेकिन ध्यान न दिए जाने पर यह एक्जिमा (लाल चकत्ते) या घावों से खून के रिसाव की वजह बनती हैं। एक अन्य संभावित परेशानी सेकंडरी बैक्टीरियल इन्फेक्शन (लाल त्वचा, सूजन, पस) होता है जिसमें एंटीबायोटिक्स लेने की जरूरत पड़ जाती है। बहुत कम मामलों में ही सही, सूखी त्वचा का एलर्जी से भी संबंध पाया जाता है।

# सर्दियों में ड्राई स्किन से हैं परेशान

## आजमाएं ये घरेलू नुस्खे झट से मिलेगा आराम


### त्वचा में नमी रखें

त्वचा को सूखने से बचाने का सबसे आसान उपाय उसे नम रखना है। स्किन मॉइस्चराइजर इस काम में आपकी बहुत ज्यादा मदद कर सकते हैं। खास बात यह है कि मॉइस्चराइजर जितना ज्यादा गाढ़ा और चिकना होगा, उतना ही ज्यादा प्रभावी होगा। इसमें तीन तरह की मुख्य वस्तुएं होती हैं-

1- ह्यूमेक्टेंट्स जो नमी को आकर्षित करते हैं और इसमें सेरेमाइड्स, ग्लिसरीन, सॉर्बिटॉल, हायएल्यूरोनिक एसिड और लेसिथिन होते हैं।

2- दूसरा समूह होता है पेट्रोलेटम (पेट्रोलियम जेली), सिलिकॉन, लेनोलिन और मिनरल ऑइल का। यह नमी को त्वचा में ही कायम रखने में मदद करते हैं।

3- लिनोलेइक, लिनोलेनिक और लॉरिक एसिड्स जैसे एमोलिएंट्स। यह त्वचा के सेल्स के बीच की जगहों को भरकर उसे मुलायम बनाए रखते हैं।



*कुल मिलाकर सबसे प्रभावी (और सबसे किफायती) की श्रेणी में पेट्रोलियम जैली और मॉइस्चराइजिंग ऑइल (जैसे मिनरल ऑइल) को रखा जा सकता है। दरअसल, इनमें पानी का अंश नहीं होता और नहाने के बाद त्वचा को नम रखने में यह सहायक होते हैं। कम चिकने मॉइस्चराइजर ज्यादा आकर्षक मगर कम प्रभावी होते हैं।*

### सूखी त्वचा से कैसे बचें?

- गर्म पानी से नहाने या शॉवर करने की अवधि को 5 से 10 मिनट तक ही सीमित कर दें। जितना ज्यादा नहाएंगे त्वचा की तैलीय परत कम होती जाएगी।
- नहाने के लिए बहुत गर्म पानी की बजाय कुनकुना (गुनगुना) पानी इस्तेमाल करें।
- साबुन का इस्तेमाल कम से कम करें।
- सेटाफिल, ऑइलटम-एडी, एक्वेनिल जैसे सोप-फ्री क्लीन्सर्स का इस्तेमाल करें।
- खुशबूदार साबुन, अल्कोहल से दूरी बनाएं।
- बाथ स्पंज, स्क्रब ब्रश और कपड़े धोने को टालें।
- नहाने के बाद शरीर को सूखाने के दौरान टॉवेल को जोर से न रगड़ें।
- नहाने या हाथ धोने के तत्काल बाद मॉइस्चराइजर लगाएं।
- पेट्रोलियम जैली और गाढ़े क्रीम्स का चिपचिपापन टालने के लिए पहले उसे कुछ देर हाथ में मलें फिर शरीर के प्रभावित हिस्से पर लगाएं।
- त्वचा पर कभी न खुजाएं। मॉइस्चराइजर लगाने पर वैसे इसकी जरूरत ही नहीं पड़ेगी।
- खुजली वाले हिस्से पर कोल्ड पैक से भी राहत मिल सकती है।
- खुजली पैदा करने वाले वूलन स्वेटर, जैकेट सीधे शरीर पर न पहनें। पहले कॉटन का कपड़ा पहनें, उसके ऊपर ऊनी कपड़े पहनें।

### कब मिलें डॉक्टर से

मौसम में बदलाव या उम्र बढ़ना आपकी त्वचा के सूखने की वजह न हो तो डॉक्टर से मिलना ही बेहतर विकल्प होगा। हो सकता है त्वचा का कोई और रोग हो। घरेलू उपचार या बाजार से लाए गए मॉइश्चराइजर त्वचा के सूखने की समस्या को और अधिक ना बढ़ा दें।

सेहत

# आपकी त्वचा को कैसे प्रभावित करती है डायबिटीज

## इसके लक्षण और बचाव

वर्तमान समय में डायबिटीज एक गंभीर समस्या बनती जा रही है, आज इससे पूरी दुनिया प्रभावित है। डायबिटीज को शुरुआती निदान और उपचार के माध्यम से समय पर बीमारियों को नियंत्रित करने में मदद मिल सकती है। चूंकि अनियंत्रित रक्त शर्करा का स्तर कई गंभीर जटिलताओं से जुड़ा होता है, इसलिए समय पर बीमारी को नियंत्रित करने के लिए आवश्यक सावधानी बरतने की जरूरत होती है। डायबिटीज के शुरुआती चरण में आपको बार-बार पेशाब आना, भूख बढ़ जाना, धुंधली दृष्टि, थकान, प्यास बढ़ जाना, हाथ-पैरों में झुनझुनी, यीस्ट संक्रमण और घावों का धीमी गति में सही होना जैसे लक्षण दिखाई दे सकते हैं। डायबिटीज के लक्षण त्वचा पर भी दिखाई देते हैं। अनियंत्रित रक्त शर्करा का स्तर भी रोगी की त्वचा को प्रभावित करता है। यहां हम आपको त्वचा पर दिखने वाले डायबिटीज के कुछ सामान्य लक्षणों के बारे में बता रहे हैं।



### त्वचा पर दिखने वाले डायबिटीज के लक्षण क्या हैं

शुरुआती चरण के दौरान एक डायबिटीज रोगी की त्वचा पर पैच दिखाई दे सकते हैं। डार्क स्किन के ये पैच गर्दन या बगल (कांख) पर दिखाई दे सकते हैं। यह पैच सॉफ्ट हो सकता है। कुछ मामलों में व्यक्ति को रूखी त्वचा का अनुभव हो सकता है।

**डायबिटीज और त्वचा संबंधी समस्याओं के बीच क्या संबंध है?**

अनियंत्रित ब्लड शुगर लेवल मुख्य रूप से त्वचा संबंधी समस्याओं को जन्म देता है। विशेषज्ञों की मानें तो मधुमेह और त्वचा के संबंधी समस्याओं के बीच एक गहरा संबंध है, जिसे नकारा नहीं जा सकता है। त्वचा संबंधी ऐसी कई समस्याएं हैं जो मधुमेह के कारण हो सकती हैं। हालांकि, इन त्वचा संबंधी समस्याओं को डायबिटीज को नियंत्रित कर रोका जा सकता है। डायबेटिक डर्मोपैथी एक शब्द है जिसका उपयोग विशेष रूप से पैरों के सामने की त्वचा पर छोटे, भूरे धब्बों का वर्णन करने के लिए किया जाता है। रोगी आमतौर पर इन त्वचा के धब्बों के कारण कोई लक्षण विकसित नहीं करते हैं और ये डायबिटीज के ज्यादातर रोगियों में होते हैं। यह लंबे समय से डायबिटीज वाले पुराने रोगियों में अधिक आम है। त्वचा में ये बदलाव डायबिटीज के कारण त्वचा में रक्त परिसंचरण में कमी के कारण होते हैं।

### उपचार के क्या विकल्प हैं

